सुविचार
हथियार स्वयं खतरनाक नहीं होते, परन्तु मानव के अन्दर छिपा क्रोध ही उन्हें हानिकारक बना देता है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. ४ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१९२ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# लोकांकडील पैसा संपला बचत निम्म्यावर आली

नवी दिल्ली : काही महिन्यांपूर्वी महागाईमुळे लोकांनी ९ लाख कोटी रुपयांएवढी प्रचंड बचत खर्च केल्याचा अहवाल आलेला असताना आरबीआयच्या डेप्युटी गव्हर्नरांनी खळबळजनक आकडेवारी दिली आहे. लोकांकडील ठेवींच्या स्वरुपात असलेला पैसा संपला असून लोकांची बचत निम्म्यावर आल्याचेही मायकल देवव्रत पात्रा यांनी म्हटले आहे.




कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीच्या कार्यक्रमात पात्रा यांनी ही माहिती दिली. ठेवींमध्ये कपात झाल्याने कुटुंबांची आर्थिक बचत आटत चालली आहे. हे लोक आता आर्थिक मालमत्तेपासून घरांसारख्या भौतिक मालमत्तांकडे वळू लागले आहेत. कोरोना काळाच्या बचतीच्या पातळीच्या जवळपास निम्मीच बचत आता लोकांकडे शिल्लक राहिली असल्याचे ते म्हणाले.

ठेवींची झीज झाल्यामुळे कुटुंबांची निव्वळ आर्थिक बचत घसरली आहे आणि आर्थिक मालमत्तेतून घरासारख्या भौतिक मालमत्तेकडे स्थलांतरित झाले आहे. अलीकडील महामारी २०२०-२१ च्या पातळीपासून जवळजवळ निम्मी झाली आहे. येत्या काळात उत्पन्न वाढल्याने पुन्हा ही कुटुंबे आर्थिक संचय करणार आहेत. ही प्रक्रिया आधीच सुरु झाली आहे. ही मालमत्ता ०.९ टक्क्यांनी (पान ४ वर)

## बलात्काऱ्यांना १० दिवसांत फाशी

कोलकाता : पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील बलात्कार आणि हत्या प्रकरणामुळे देशभर संतापाची लाट उसळल्याचं दिसून आलं. तर, महाराष्ट्रातील बदलापूर येथील बाललैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य सरकारनेही शाळेसंदर्भात कडक नियमावली जारी केली आहे. त्यामुळे, महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत सर्वच सरकार गंभीर बनल्याचं दिसून येतं. त्यातच, पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही गेल्याच आठवड्यात आपल्या भाषणात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांवर भाष्य केलं होतं. आता, पश्चिम बंगालमधील ममता सरकारने महिला अत्याचारसंदर्भाने विधानसभा सभागृहात अँटी रेप बिल मंजूर करण्यात आलं आहे.

# आंदोलन सुरुच राहणार; एस.टी. कर्मचारी ठाम

मुंबई : ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर एसटी कर्मचा-यांनी राज्यभरात संप पुकारला असून राज्यभरात एसटी कर्मचा-यांच्या आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामुळे अनेक ठिकाणी प्रवाशांचे हाल झाले. यातच एसटी कर्मचारी आंदोलनावर ठाम आहेत. मंत्री उदय सामंत यांच्यासोबत कृती समितीची एक बैठक पार पडली. परंतु, ही बैठक निष्फळ ठरली.

गणपती उत्सव हा इतका मोठ्या ताकदीचा उत्सव साजरा केला असतो. असे असताना अशा प्रकारचे आंदोलन होणे हे कितपत योग्य आहे, याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे. गणेशोत्सवात कोणत्याही नागरिकाला जाण्या-येण्यास त्रास होऊ नये, ही सरकारची भूमिका आहे. जनतेचा विशेषत: गणेश भक्तांचा विचार करावा, ही माझी विनंती आहे. गणेश भक्तांची गैरसोय होणार नाही,



यासाठी संप मागे घ्यावा, अशी विनंती उदय सामंत यांनी केली. परंतु, कर्मचारी आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. त्यामुळे एसटी कर्मचा-यांसोबतची सरकारची ही बैठक निष्फळ ठरली आहे.

सरकारने जर वेळेत बैठक घेतली असती तर ही वेळ आली नसती. मुख्यमंत्र्यांनी उद्याच्या बैठकीत एसटी कर्मचा-यांसाठी योग्य तो निर्णय घ्यावा. राष्ट्रपतींच्या दौ-यामुळे मुख्यमंत्र्यांकडे वेळ नाही आम्हाला माहिती आहे. मात्र तोपर्यंत हे आंदोलन चालूच राहणार. आंदोलन मागे घेणार नाही. राज्यभर सर्व एसटी बंद आहेत. कामगारांनी स्वत:च्या हितासाठी राजकीय पाठबळ असताना हे आंदोलन उभे केले आहे. एसटी कामगारांचे वेतन राज्य सरकारच्या कर्मचा-यांप्रमाणे केले पाहिजे, अशी प्रतिक्रिया एसटी कामगार कृती समितीचे पदाधिकारी संदीप शिंदे यांनी दिली.

सदावर्ते हा कामगार चळवळीला डाग

आमच्या मुलाबाळांच्या भवितव्याचा प्रश्र्न आहे. मागील काही महिन्यात तुम्ही या विषयात राजकारण केला आहे. स्वत:चा टीआरपी वाढून झाला आहे. स्वत:चा गल्ला वाढवून झाला आहे. गुणरत्न सदावर्ते हा एसटी (पान ४ वर)

# श्री. दिलीपराव देशमुख यांचा लातूरकराकडून सत्कार



लातूर / प्रतिनिधी- द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टिक असोसिएशन इंडिया पुणे या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा अतिशय प्रतिष्ठित मानाचा २०२४ चा साखर उद्योग गौरव पुरस्कार लातूर येथील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा मांजरा साखर परिवारातील संस्थांचे मार्गदर्शक आदरणीय दिलीपरावजी देशमुख यांना पुणे येथील शानदार सोहळ्यात नुकताच प्रदान करण्यात आला त्यामुळें लातूरकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे त्याबद्दल मंगळवारी लातूर शहरातील विविध सामाजिक संस्था, प्रतिष्ठित नागरिक, यांच्यावतीने आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला दरम्यान यावेळी सत्कार करण्यासाठीं शहरातील विविध संस्था पदाधिकारी, जेष्ठ नागरिक डॉक्टर वकील, इंजिनियर विचारवंत पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठीं उपस्तीती होती त्यामुळे आशियाना निवासस्थान गर्दीने खचाखच भरून गेलेले दिसत होते द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट इंडिया पुणे या संस्थेने देशभरातील साखर इंडस्ट्रीजमध्ये उत्कृष्ठ कार्य करणारे कारखान्याचे मार्गदर्शक/ चेअरमन संस्थापक अशा नामवंत व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो त्यात राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख ( लातूर ) यांना २२४ चा साखर उद्योग गौरव पुरस्कार मिळाला आहे साखर इंडस्ट्रीजमध्ये अतिशय सूक्ष्म नियोजन करून उत्तम प्रशासन, (पान ४ वर)

# लाडक्या भावांच्या खात्यातहि पैसे जमा

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या घोषणेपासून आजपर्यंत राज्यात १ लाख १० हजार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासाठी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६० हजाराहून अधिक युवा राज्यातील खाजगी तसेच शासकीय संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत , अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज दिली. विशेष म्हणजे आत्तापर्यंत २ लाखांपेक्षा जास्त युवकांनी या योजनेसाठी नोंदणी केली असून ८ हजार १७० आस्थापनांमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळणार आहे. शासनाच्या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात जुलै आणि ऑगस्टमध्ये रुजू झालेल्या युवांना डीबीटीद्वारे विद्यावेतन १० सप्टेंबरपर्यंत त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर मिळणार आहे, अशी माहितीही मंत्री लोढा यांनी दिली. त्यामुळे, लाडक्या भावांच्या खात्यातही लवकरच पैसे जमा होतील.

याविषयीची अधिक माहिती देताना मंत्री लोढा म्हणाले, भविष्यातील रोजगाराची (गेल) आव्हाने ओळखून आजच कार्य प्रशिक्षण देऊन, रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून युवक-युवतींना रोजगारक्षम बनविणारी, ङ्गमुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनाफ ही राज्य शासनाने सुरू केली आहे. या योजनेमध्ये सरकारी तसेच खासगी आस्थापनांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. अधिकाधिक युवकांना प्रशिक्षणाबरोबर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. या योजनेंतर्गत सहभागी होण्यासाठी ८ हजार १७० आस्थापनांनी नोंदणी केली आहे. तसेच २ लाख २१ हजार २४४ प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणासाठी नोंदणी केलेली आहे.

धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक युवा रुजू

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहे. या योजनेला फक्त शहरी विभागातच नाही तर ग्रामीण भागातही चांगला प्रतिसाद मिळत आहे. विभागवार या योजनेचा आढावा घेताना छत्रपती संभाजीनगर आणि त्या खालोखाल अमरावती विभागाने यामध्ये चांगली कामगिरी केली आहे. जिल्हावार विचार करता धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ५ हजार युवा रुजू झाले आहेत. शासनाच्या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात जुलै आणि ऑगस्टमध्ये रुजू झालेल्या युवांना डीबीटीद्वारे विद्यावेतन १० सप्टेंबरपर्यंत त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर मिळणार आहे, असे मंत्री लोढा म्हणाले.

१० लाख युवकांना प्रशिक्षण

या योजनेतून महाराष्ट्रातील युवकांना फक्त रोजगारच मिळणार नसून उद्योगांना लागणारे मनुष्यबळ सहज उपलब्ध होऊन महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होणार आहे. ही योजना वर्षभर सुरु राहणार असून या योजनेमार्फत १० लाख युवांना प्रशिक्षणातून रोजगार देण्याचे उद्दिष्ट आहे. सर्वसमावेशक अशी ही योजना महाराष्ट्र शासनाने युवकांसाठी आणली असून युवकांनी आणि उद्योगांनीदेखील याचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन मंत्री लोढा यांनी केले आहे.



नाथसंस्थान औसा येथे श्री. राजु पाटील, श्री. शाम कुलकर्णी, श्री. रोहित हंचाटे यांचा श्री. गहिनीनाथ महाराज यांनी त्यांचा सत्कार करून आशिर्वावाद दिला.

# वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा

लातूर / प्रतिनिधी- मा. खा. अजितजी गोपछडे वीरशैव लिंगायत समाजातील धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, सहकारी क्षेत्रातील सेवाव्रतींचा समक्ष भेटून सन्मान करणार आहेत.



महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत समाज शेकडो वर्षांपासून आपलें सामाजिक योगदान निष्ठेने आणि कर्तव्य भावानेतून देत आला आहे. व्यापार उद्योगात आपला वारसा जपत आता सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या समाजाच्या कर्तृत्ववान व्यक्ती आणि संस्थाना समक्ष सदिच्छा भेट देऊन त्यांचा सन्मान व्हावा म्हणून या यात्रेचे खा. अजित गोपछडे यांनी आयोजन केले आहे.

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रसंत शिवालिंग शिवाचार्य अहमदपूरकर महाराज यांच्या समाधीचे अभिवादन करून त्यांच्या कर्मभूमीतुन या यात्रेस आरंभ होईल.

दि.५ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर दरम्यान ही वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा श्रीक्षेत्र राजूर (अहमदपूर) (पान ४ वर)

# अतीवृष्टी आणि पुरग्रस्थांना शासनाने तातडीने मदत करावी :आ. अमित देशमुख

नांदेड/ हिंगोली /प्रतिनिधी - अतिवृष्टी आणि नंतर आलेल्या पुरामुळे मराठवाड्यात उभ्या शेती पिकाचे आणि जमिनीचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, शासनाने आपतग्रस्तांना दिलासा देण्यासाठी मदत जाहीर करावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी नांदेड, हिगोली जिल्हयात अनेक ठिकाणी अतीवृष्टी आणि पूरग्रस्थ भागाच्या पाहणी नंतर केली.



मागच्या तीन-चार दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात शेती पीकाचे मोठे नुकसान झाले आहे. चांगल्या भरात असलेले सोयाबीन, काढणीस आलेला मुग, उडीद, तसेच तुर, हायब्रीड ज्वारी ऊस, केळी यासह इतर शेती पीकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काही ठिकाणी माती वाहून गेल्याने जमीन नापीक बनली आहे. अतीवृष्टीने नंतर आलेल्या पुरामुळे अनेक शहरात व गावात पाणी घुसल्याने घराची पडझड झाली आहे. जीवनावश्यक वस्तुची नासाडी झाली आहे. अनेक परीवारांच्यास समोर उपजीवीकेचा प्रश्र्न निर्माण झाला आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज दुपारी आमदार मोहन हंबर्डे तसेच काँग्रेस पदाधिकारी यांच्यासह (पान ४ वर)

# विधानसभा जिद्दीने लढायची आणि जिंकायचीच लातूर ग्रामीणच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागावे




लातूर / प्रतिनिधी - लोकसभा निवडणुकीचे निकाल ही एक चिंतेची बाब असली तरी या लोकसभेत महाविकास आघाडीपेक्षा केवळ अर्धा टक्का मते महायुतीला राज्यात कमी मिळाली. केंद्रात सत्ता आली मोदीजी पंतप्रधान झाले, सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी विविध योजना सुरू करणाऱ्या महायुतीची सत्ता पुन्हा राज्यात येणार यात शंका घेण्याचे कारण नाही तेव्हा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जिद्दीने लढायचे आहे आणि जिंकायचेही आहे या मानसिकतेतून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री ना. मुरलीधर अण्णा मोहोळ यांनी केले.

येणाऱ्या काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे पक्षपदाधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रमुख कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात केंद्रीय राज्यमंत्री ना. मुरलीधरअण्णा मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी दुपारी झाली या बैठकीस भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, जिल्हा समन्वयक प्रा. किरण पाटील, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, जिपचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजपा नेते राजेश कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे यांच्यासह इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ना मोहोळ यांचे पांडुरंगाची मूर्ती देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी (पान ४ वर)

# जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवाराची पालकमंत्री गिरीष महाजन यांच्याशी निर्णायक चर्चा

लातूर / प्रतिनिधी- प्रलंबित लातूर जिल्हा रूग्णालय हस्तांतरण निधी वर्ग करून त्वरित भूमिपूजन करावे अशी मागणी माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री गिरीष महाजन यांच्याकडे पुन्हा एकदा केली. उदगीर येथे नियोजित राष्ट्रपती यांच्या उपस्थितीत होत असलेल्या सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी ते लातूर विमानतळावर उतरले होते.

लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी शासनाने जागा हस्तांतरण करण्यास मंजुरी दिलेली आहे. यासाठी लागणारा मोबदला रुपये ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास देण्याची तरतूद देखील केली आहे. मात्र अद्याप यासाठीचा निधी आरोग्य विभागाने कृषी विभागास वर्ग केलेला नाही. हा निधी त्वरीत वर्ग करून लातूरच्या प्रलंबित आणि मंजूर असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन करून लातूरकरांना उपकृत करावे



अशी विनंती यावेळी करण्यात आली. हा निधी वर्ग करून ६० दिवसांच्या आत जिल्हा रूग्णालय हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे असा शासन आदेश (१९ जून २०२४) आहे. याची मुदत १९ ऑगस्ट २०२४ रोजी संपली आहे.

गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न शासनाने मार्गी लावावा यासाठी माझं लातूर परिवाराने निर्णायक लढा दिला आहे. ऐतिहासिक साखळी उपोषण, मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री यांना विनंती केली होती.

जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून आपण हा प्रश्न त्वरित मार्गी लागेल यासाठी त्वरीत निर्देश द्यावेत असा हट्ट

माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळाने केला. या विषयाचे गांभीर्य (पान ४ वर)

# दीपावलीकरिता रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई - लातूर साप्ताहिक दिवाळी स्पेशल रेल्वे

लातूर - मध्य रेल्वे प्रशासनाच्या वतीने दीपावलीच्या सणानिमित्त रेल्वे प्रवाशांच्या सोयीकरिता मुंबई - लातूर आणि लातूर - मुंबई ही साप्ताहिक दीपावली स्पेशल रेल्वे सुरू करण्याचा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या रेल्वेमुळे असंख्य प्रवाशांना प्रवासाची मोठी सोय होणार आहे अशी माहिती मध्य रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य चंद्रकांत कातळे यांनी दिली.



दीपावलीचा सण मोठा, नाही आनंदाला तोटा याप्रमाणे प्रत्येकाची मुंबई - पुण्याहून आपल्या गावाकडे दिवाळीसाठी जाण्याची ओढ असते मात्र बऱ्याच वेळा प्रवासाची सोय होत नसल्याने अनेकांना इच्छा असूनही गावाकडे जाता येत नाही ही अडचण लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाच्या वतीने लातूरकरिता स्वतंत्रपणे मुंबई - लातूर आणि लातूर - मुंबई ही दिवाळी स्पेशल साप्ताहिक रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य रेल्वेने घेतलेल्या निर्णयानुसार या रेल्वेच्या चार फेऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत अशी माहिती चंद्रकांत कातळे यांनी दिली.

दीपावलीच्या निमित्ताने दि १८ ऑक्टोबर २०२४, दि. २५ ऑक्टोबर २०२४, दि. १ नोव्हेंबर २०२४ आणि दि. ९ नोव्हेंबर २०२४ या तारखेला मुंबई - लातूर (०११०५) मुंबईहून रात्री १२.३० वाजता लातूरकडे रवाना होईल आणि सकाळी ११.०० लातूरला पोहोचेल. या रेल्वेचा परतीचा प्रवास लातूर - मुंबई (०११०६) त्याच दिवशी दुपारी ४.३० लातूरहून निघेल आणि पहाटे ४.१० वाजता मुंबईत पोहोचेल. या रेल्वेगाडीला २ एसी कोच, ८ स्लीपर कोच आणि ६ जनरल डबे असणार आहेत. सदरील साप्ताहिक दीपावली स्पेशल रेल्वेगाडीमुळे रेल्वे प्रवाशांना मोठी सोय होणार असून या रेल्वेचे लवकरच बुकिंग सुरू होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेचे सल्लागार समिती सदस्य चंद्रकांत कातळे आणि शामसुंदर मानधना यांनी दिली.

# गरुड चौक व महाराणा प्रतापनगर येथे शिवसेना शाखेची स्थापन

लातूर:- राज्याचे मुख्यमंत्री शिवसेना मुख्य नेते पक्ष प्रमुख मा.एकनाथ शिंदे साहेब, मा. खासदार श्रीकांत शिंदे साहेब, शिवसेनेचे राज्य सचिव श्री.संजयजी मोरे साहेब,मराठवाडा विभागीय संपर्क प्रमुख श्री आनंदराव जाधव साहेब, लोकसभा प्रमुख श्री बालाजीराव काकडे साहेब, जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव साहेब, जिल्हा महिला संपर्क प्रमुख सौ रंजना ताई कुलकर्णी, जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव,शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन दाने यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा विभागीय संपर्क प्रमुख श्री आनंदराव जाधव साहेब यांच्या वाढदिवसानिमित्य जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव यांच्या उपस्थितीत गरुड चौक लातूर व महाराणा प्रतापनगर तालुका लातूर येथे मंगळवार दि.३ सप्टेंबर रोजी शिवसेनेची शाखेची स्थापना करण्यात आली.



यावेळी लातूर जिल्हा संपर्कप्रमुख बळवंत भाऊ जाधव, महिला जिल्हा प्रमुख कल्पनाताई बावगे , उपजिल्हा प्रमुख सतिष देशमुख ,शहर प्रमुख परवेजभाई पठाण , उपशहर प्रमुख विजयकुमार कांबळे , शहर संघटक प्रमुख ड.बालाजी सुर्यवंशी , तालुका प्रमुख तथा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जिल्हा सदस्य सदाशिव गव्हाणे ,युवासेना जिल्हाप्रमुख कुलदीप सुर्यवंशी, उपतालुका प्रमुख नितीन (बापू) महाजन , उपशहर प्रमुख श्रीहरी डोपे , युवा सेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा सरवदे , युवा सेना जिल्हा सचिव गणेश पवार , उपशहर प्रमुख राजु बागवान , कामगार सेना प्रमुख शमशोद्दीन शेख , महिला उपजिल्हा प्रमुख अनिताताई नागिमे , महिला बचतगट जिल्हा प्रमुख सौ वर्षाताई धडे , महिला शहर संघटक कुशाल शिंदे ,तालुका उप प्रमुख शाम साबळे , सौ शिवनंदा दानाई , बचत गट प्रमुख श्रीमती सुरेखा बिडवे , लक्ष्मीबाई चव्हाण, उपतालुका प्रमुख नितीन बापू महाजन , उप तालुका प्रमुख शाम साबळे, उप शहर प्रमुख राजू बागवान , युवासेना उप जिल्हाप्रमुख कृष्णा सरवदे, युवा सेना जिल्हा सचिव गणेश पवार ,युवासेना उप जिल्हाप्रमुख ग्रामीण धनराज शिंदे, युवासेना सोशल मीडिया जिल्हा प्रमुख नामदेव सुरवसे, तालुका प्रमुख गणेश सुरवासे, शहर प्रमुख पृथ्वीराज शिंदे, फरीद शेख युवा सेना उपशहर प्रमुख आशिष कांबळे , महताब शेख, शिवाजी तुपसुंदरे ,अक्षय सूर्यवंशी, महिला शिदू चोथवे ,शोभा चोथवे, रुक्मिण चोथवे, संगीता मळकुंदे ,अर्चना कुंभार आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी गरुड चौक शाखेचे पदाधिकारी -: सोमनाथ बावगे शाखा प्रमुख , अजय चव्हाण उप शाखा प्रमुख, सुशिल वाघमारे शाखा सचिव , बापु केंगार शाखा सहसचिव, सदस्य : ज्ञानेश्वर बिराजदार, ओमकार सुर्यवंशी, रोशन सुर्यवंशी, सोहेल शेख, बालाजी कोपन बोयणे , प्रदिप सोनकांबळे, फारुक सय्यद, मनोज धनगर, निखील काळे, संकेत चव्हाण, महादेव सलघंटे तर महाराणा प्रतापनगर येथील विक्रम चोथवे शाखा प्रमुख , दयानंद कांबळे , उप शाखा प्रमुख, सतीष लोखंडे शाखा सचिव ,आझर शेख शाखा सहसचिव ,सदस्य भरत चोथवे, प्रविण चोथवे, अजय चोथवे, ओमप्रकाश सुर्यवंशी, राम सुर्यवंशी, काशीनाथ कांबळे, कैलाश पारवे, संतोष वाघमारे यांची निवड करण्यात आली.

# वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचे आयोजन

## राष्ट्रसंतांची कर्मभूमी भक्तीस्थळ ते महात्मा बसवेश्वरांची कर्मभूमी शक्तीस्थळ पर्यंत निघणार



अहमदपूर (प्रतिनिधी) -समाजातील प्रतिष्ठित समाजसेवक डॉक्टर विचारवंतांचा सन्मान करण्यासाठी यात्रेचे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रसंतांची कर्मभूमी असलेल्या भक्तिस्थळापासून ते महात्मा बसवेश्वरांची कर्मभूमी असलेल्या शक्ती स्थळ मंगळवेढा पर्यंत ही सन्मान यात्रा जाणार आहे. ही सन्मान यात्रा दि. ५ सप्टेंबर रोज गुरुवारी दुपारी ३ वाजता आरंभ राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या भक्ती स्थळावरून आरंभ होणार असून ती यात्रा अहमदपूर चाकूर, लातूर, निलंगा, औसा, तुळजापूर, सोलापूर, जत, कवठेमहांकाळ कोल्हापूर सांगली पुणे नगर, बारामती, पंढरपूर, मार्गे मंगळवेढा येथे दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी समापण होणार आहे.

या सन्मान यात्रेचा शुभारंभ राष्ट्रसंतांची उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या व आचार्य गुरुराज स्वामी महाराजांच्या शुभहस्ते होणार असून या यात्रेचे नेतृत्व खा . डॉ. अजित गोपछडे करणार असून यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन साब महाजन, शिवानंद हेगणे, राजकुमार मजगे, बालाजी पाटील चाकुरकर, प्रताप पाटील, ओम भाऊ पुणे, शिवकुमार उटगे, राजकुमार कल्याण, विधीज्ञ निखिल कासनाळे, प्रशांत बिब्राळे, शंकर भुरे पाटील, संभाजी पाटील चाकूरकर, रवी महाजन, ओंकार पुणे, संदीप चौधरी, गणेश शेटकर, अनिल कासनाले, राजकुमार कल्याणी, प्रा विश्वंभर स्वामी यांनी केले आहे

# कोथिंबीर, मेथीला विक्रमी भाव

नाशिक : प्रतिनिधी- जिल्ह्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे तसेच पिठोरी अमावास्या आणि बैलपोळा असल्याने बाजारात कोथिंबिरीपाठोपाठ मेथीची आवक देखील कमी झाली आहे. परिणामी नाशिक बाजार समितीमध्ये कोथिंबीर आणि मेथीने उच्चांकी भाव गाठला. कोथिंबीर ४५० तर मेथी चक्क २५० रुपये जुडीप्रमाणे विकली गेली. विक्रीला आणलेल्या कोथिंबीर आणि मेथीला रेकॉर्डब्रेक भाव मिळाल्याने शेतक-यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र दुसरीकडे ग्राहकांच्या तोंडचे पाणी पळाले.



**सौ. भाग्यश्री ताई कौळखेरे यांनी श्रावण सोमवार निमित्त रुद्राक्ष वाटप केले. श्री. आशिष मोतीपवळे, सौ. नम्रता पंचाक्षरी मोतीपवळे, अॅड. सुधाकर व सौ. आशा मोतीपवळे व इतर उपस्थित होते.**

### आत्मबोध ८

कोणत्या योनीत जन्मावे ? ।
नाही कोणास ठावे ।
जन्मा कधी यावे ।
माहित नाही ।। १ ।।

आपले काय जाणुया ।
सर्वांचे हित करुया ।
अहंकार देऊया ।
भगवंतास ।। २ ।।

ईश्वराचे नाम घेऊ ।
सर्वस्व त्यालाच देऊ ।
स्वरूप चिंतनात राहू ।
आनंदाने ।। ३ ।।

जगण्याची ही रीत ।
करतो तो प्रीत ।
राहतो आपण निश्चिंत ।
त्याच्या कृपे ।। ४ ।।

सिद्धदास, सोलापूर
२३/०१/२०२२

# राष्ट्रीय खेळाडू सुरज कदम यांचा सत्कार



अहमदपूर/ प्रतिनिधी- तालुक्यातील ताबंटसागवी ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच तथा आदर्श शेतकरी कालीदास कदम यांचे सुपुत्र राष्ट्रीय खेळाडू सुरज कदम यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

तलवारबाजी मधील राष्ट्रीय खेळाडू सुरज कदम यांना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षाताई घुगे व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी नुकताच गुणवंत खेळाडू म्हणून पुरस्कार देऊन गौरवले आहे. सुरज कदम यांना गुणवंत खेळाडू पुरस्कार मिळाल्यामुळे भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी सुरज च्या घरी जाऊन सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी राजाराम पाटील, सरपंच कालीदास कदम, बाबासाहेब पाटील यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेख इनुस यांचा सत्कार संपन्न

अहमदपूर दि.०३ (बालाजी कारामुंगीकर) येथील यशवंत ज्यु. कॉलेजचा माजी विद्यार्थी शेख इनुस उमराव यांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथुन जवळच असलेल्या टाकळगाव येथील व यशवंत ज्यु. कॉलेजचा माजी विद्यार्थी शेख इनुस उमराव यांची नुकतीच सिंधुदुर्ग पोलिसात निवड झाल्यामुळे कॉलेजच्या वतिने सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. सय्यद एम. यू., विज्ञान प्रमुख प्रा. दिनेश तोंडारे, डॉ. बालाजी कारामुंगीकर, प्रा. रविकुमार इरफळे, प्रा. स्नेहल बोधने आदींची उपथिती होती. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# अरबी समुद्रात बचावासाठी गेलेले हेलिकॉप्टर कोसळले

नवी दिल्ली : भारतीय तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर गुजरातमधील पोरबंदरच्या किनारपट्टीवर बचाव मोहिमेदरम्यान अरबी समुद्रात कोसळले. त्यानंतर हेलिकॉप्टरमधील तीन क्रू सदस्य बेपत्ता झाले असून, एकाची सुटका करण्यात आली. तर बेपत्ता तीन जणांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. हेलिकॉप्टरला सोमवारी रात्री उशिरा समुद्रात कोसळलेल्या हेलिकॉप्टरला बचाव मोहिमेदरम्यान इमर्जन्सी लँडिंग करावी लागली. यावेळी हार्ड लँडिंग झाल्याने ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील पोरबंदरपासून सुमारे ४५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हरी लीला या मोटार टँकरवरील जखमी क्रू सदस्यांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी सोमवारी रात्री उशिरा साधारण ११च्या सुमारास हेलिकॉप्टरने उड्डाण घेतले होते.

भारतीय तटरक्षक दलाच्या म्हणण्यानुसार, चार क्रू मेंबर्स असलेल्या अॅडव्हान्स्ड लाईट हेलिकॉप्टर (एएलएच) ला समुद्रात इमर्जन्सी हार्ड लँडिंग करावे लागले आणि या आपत्कालीन परिस्थितीत ते समुद्रात पडले. या हेलिकॉप्टरमध्ये ४ क्रू मेंबर होते. त्यातील एका क्रू मेंबरला शोधण्यात यश आले आहे, तर उर्वरित तिघांचा शोध सुरू आहे. हेलिकॉप्टरचे लोकेशन सापडले आहे. या बचाव कार्यासाठी, बेपत्ता कर्मचा-यांच्या शोधासाठी ४ जहाजे आणि २ विमाने परिसरात तैनात केली आहेत.

# महाविद्यालयात हार्ड आणि सॉफ्ट कौशल्य संपादनाच्या संधी उपलब्ध : प्राचार्य डॉ. वसंत बिरादार




अहमदपूर (प्रतिनिधी)- परिस्थितीवर न रडता दर्जेदार गुणवत्तेशी लढा द्या. महाविद्यालय हे मौजमजा करण्याचे ठिकाण नाही तर करियर घडविण्यासाठी आवश्यक असलेले हार्ड आणि सॉफ्ट कौशल्य प्राप्त करण्याच्या संधी उपलब्ध होतात असे प्रतिपादन ज्येष्ठ शैक्षणिक विचारवंत , समीक्षक तथा प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केले.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या आय. क्यू. ए.सी. विभागांतर्गत ग्रंथालय विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या बी.ए. प्रथम वर्षातील नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते. तर उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी यांच्यासह ग्रंथालय विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रो. डॉ. अनिल मुंढे, डॉ. सतीश ससाणे, अजय मुरमुरे यांची किसान पिठावर प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी पुढे बोलतांना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, महाविद्यालय हे करिअरच्या दृष्टिकोनातून स्वतः ला माणूस म्हणून घडविण्याचे ठिकाण आहे . अगोदर स्वतः ला घडवा तरच समाज आणि राष्ट्र घडेल हा मोलाचा संदेश ही त्यांनी दिला.

या कार्यक्रमाप्रसंगी उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्तगुणांना ओळखून आपले ध्येय निश्चित करून निरंतर प्रयत्न केल्यास जीवनात यश निश्चित मिळते. तसेच संधी विचारून येत नाही तर ती शोधावी लागते आणि मिळालेल्या संधीच सोनं करण्याचे ठिकाण हे महाविद्यालय आहे मत्याचबरोबर ते म्हणाले की, वाचनाने शब्द सामर्थ्य वाढते आणि कुठल्याही विषयावर सुंदर मांडणी करता येते , त्यातूनच विवेकी दृष्टिकोन निर्माण होतो असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रो. डॉ. अनिल मुंढे यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच आरती मंडले, शिवकन्या सुरनर व ऋतुजा सोनवणे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बी .ए. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे वही, पेन आणि गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले .

तसेच क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत कंधार जि.नांदेड येथील श्री शिवाजी महाविद्यालयात घेण्यात आलेल्या अंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून यश प्राप्त केल्याबद्दल प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी यशस्वी खेळाडू काकनाजी सुरनर , अश्विनी फड व सोनाली गायकवाड यांच्यासह क्रीडा संचालक प्रो. डॉ. अभिजीत मोरे यांचा सत्कार केला. याबरोबरच महाविद्यालय परिसरातील वृक्षांचे क्यू आर कोड निर्माण करणारे तंत्रज्ज्ञ डॉ. सचिन गर्जे यांचाही सत्कार केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक ग्रंथपाल प्रा. पी.एम. इंगळे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ . मारोती कसाब यांनी व आभार डॉ. बी.के. मोरे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेष्ठ नागरिकांसाठी

वैद्यकीय महाविद्यालयात, प्राध्यापक मेडीकलच्या चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांना क्लिनिकल औषधशास्त्र शिकवत होते, त्यांनी खालील प्रश्न विचारला: वृद्धांमध्ये मानसिक गोंधळाची कारणे कोणती? काहीचे उत्तर: डोक्यात ट्यूमर.

त्यांनी उत्तर दिले: नाही!
इतरांनी सुचवले: अल्झायमरची सुरुवातीची लक्षणे.
त्यांनी पुन्हा उत्तर दिले: नाही!

त्यांच्या प्रत्येक उत्तराच्या नकारानंतर त्यांचे प्रतिसाद येणं बंद होतं त्यांनी सर्वात सामान्य कारण सूचीबद्ध केले ते म्हणजे - निर्जलीकरण हे विनोदी वाटेल; पण ते खरे आहे. ६० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना तहान लागणे बंद होते आणि परिणामी, द्रव पदार्थ पिणे थांबवतात . आणि त्यांना द्रव पदार्थ सेवनाची आठवण करून देण्यासाठी आजूबाजूला कोणीही नसते तेव्हा ते लवकर निर्जलीकृत होतात. निर्जलीकरण गंभीर आहे आणि संपूर्ण शरीरावर परिणाम करते. यामुळे अचानक मानसिक गोंधळ, रक्तदाब कमी होणे, हृदयाची धडधड वाढणे, एनजाइना (छातीत दुखणे), कोमा आणि मृत्यू देखील ओढवू शकतो.

द्रव पिणे विसरण्याची ही सवय वयाच्या ६० व्या वर्षी सुरू होते, जेव्हा आपल्या शरीरात ५०% पेक्षा जास्त पाणी असते. ६० वर्षांवरील लोकांकडे पाण्याचा साठा कमी असतो. हा नैसर्गिक वृद्धत्व प्रक्रियेचा भाग आहे.

त्यात आणखी गुंतागुंत अशी कि जरी ते निर्जलित असले तरी, त्यांना पाणी प्यावेसे वाटत नाही, कारण त्यांची अंतर्गत संतुलन यंत्रणा फारशी काम करत नाही.

निष्कर्ष:

६० वर्षांहून अधिक वयाचे लोक सहजपणे निर्जलीकृत होतात, इतकेच नव्हे तर त्यांना शरीरात पाण्याची कमतरता आहे हे जाणवत नाही. जरी ६० वर्षांपेक्षा जास्त लोक निरोगी दिसत असले तरी, प्रतिक्रिया आणि रासायनिक कार्ये त्यांच्या संपूर्ण शरीराला हानी पोहोचवू शकतात. म्हणून येथे दोन सूचना कराव्या शा वाटतात:

१) द्रव पदार्थ सेवनाची सवय लावा. द्रवपदार्थांमध्ये पाणी, रस, चहा, नारळाचे पाणी, सूप आणि टरबूज, खरबूज, पीच आणि अननस यांसारखी पाणी समृद्ध फळे यांचा समावेश होतो; ऑरेंज आणि टेंजेरिन पण हे काम करतात. महत्त्वाची गोष्ट अशी की, दर दोन तासांनी तुम्ही काही द्रव पदार्थ सेवन करावे. हे लक्षात ठेवा !

२) कुटुंबातील सदस्यांसाठी इशारा: ६० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना सतत द्रव पदार्थ द्या. ते जेव्हा द्रवपदार्थ नाकारतात आणि तशा दिवसात चिडचिड करतात, अस्वस्थ दिसतात, ती निश्चितच त्यांच्या निर्जलीकरणाची लक्षणे आहेत. तेव्हा ज्येष्ठांनी जास्तीतजास्त पाणी प्यावेही माहिती इतरांना पाठवावी.

# यश कोणाच्या आशिर्वादाने मिळते



एका हॉटेलमध्ये प्रचंड गर्दी असायची, त्याचा फायदा घेऊन एक माणूस पैसे न देता जायचा. मी तो माणूस रोज पाहतो पण हॉटेल मालकाला कधी सांगितलं नाही.

एक दिवस विचार केला चला हॉटेल मालकाला सांगू, मी त्या माणसाबद्दल हॉटेल मालकाला सांगताच तो म्हणाला हे सांगणारे तुम्ही पहिले ग्राहक नाहीत आणि अजून बरेच ग्राहक हे सांगुन गेले आहेत.

मालकाचं बोलणं ऐकून मी विचारलं, त्याला का थांबवत नाही तर मालक म्हणाला एकदा मी त्या माणसाच्या मागेमागे गेलो तेंव्हा कळलं की तो भिकारी आहे आणि कचोरी खाऊन सरळ देवाच्या मंदिरात जातो..

जेंव्हा आपण गुपचूप देवाच्या मंदिरात गेलो तेंव्हा ती व्यक्ती देवासमोर आहे प्रार्थना करत होती कि आजपेक्षा जास्त गर्दी उद्या त्या हॉटेलमध्ये होऊ द्या म्हणजे मला कचोरी खाऊन गर्दीतून बाहेर पडता येईल.

मग मला कळलं हॉटेल आपल्या कष्टाने नाही तर त्याच्या आशीर्वादाने चालत आहे. मित्रांनो आयुष्यात कधी कधी आपण आपल्या यशावर गर्व करू लागतो पण यश कोणाच्या आशिर्वादाने मिळाले आहे माहित नाही.

यशवंत धाराशिव जिल्हा
बुधवार दि.०४-सप्टेंबर-२०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# शरणजी बस्वराज पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



मुरुम दि.३ (प्रतिनिधी) - ऊमरगा तालुक्यातील मुरूम येथील जिल्हा परिषद धाराशिव विरोधी पक्ष नेते व उमरगा जनता बँक चेअरमन शरणजी बस्वराज पाटील यांचा ६ सप्टेंबर रोजी होणारा वाढदिवस माधवराव पाटील महाविद्यालय व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या विद्यमाने विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येत आहे. ३ सप्टेंबर रोजी १० ते १ कॅरम स्पर्धा व २ ते ४ बॅडमिंटन स्पर्धा
४ सप्टेंबर रोजी १० ते १ रांघोळी स्पर्धा व २ ते ४ बुद्धिबळ स्पर्धा५ सप्टेंबर रोजी १० ते १ सर्व रोगदान शिबिर ( माधवराव पाटील महाविद्यालय मुरूम) व २ ते ४ व्याख्यान अनिकेत इनामदार ( कोरोना नंतर भारतीय जीवनशैली)६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते १० रुग्णांना फळे वाटप व स्त्री जन्माचे स्वागत,(नवजात बालिका,माता सत्कार, ग्रामीण रुग्नलयाम मुरूम) व स.१० ते ४ रक्तदान शिबिर ( माधवराव पाटील महाविद्यालय मुरूम) व स. ११ ते १२ आरोग्य जन जागृती कार्यक्रम घेण्यात येत आहेत. वाढदिवसानिमित्त आज महाविद्यालयात कॅरम स्पर्धा व बंडमिंटन स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमाचे ऊदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्रभारी डॉ. रवींद्र आळंगे, डॉ. सुजित मटकरी, डॉ. किरण राजपूत, डॉ. अविनाश मुळे,डॉ.रविद्र गायकवाड, प्रा. गोपाळ कुलकर्णी, प्रा. अशोक बावगे, प्रा. दयानंद बिराजदार, ऊपप्राचार्य योगेश पाटील,प्रा.राजनंदीनी लिमये,प्रा.सदफअलमास मुजावर,प्रा. संदिप ढंगे,प्रा.विवेकानंद चौधरी,प्रा.अनिल मोरे,मल्लिकार्जुन स्वामी,अशोक कलशेट्टी व महाविद्यालयाचे विद्यार्थी , विद्यार्थीनीची प्रमुख उपस्थिती होती.

# महात्मा बसवेश्वर नागरी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पडली पार



धाराशिव दि.३ (प्रतिनिधी) - महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था म धाराशिव या पतसंस्थेची ३५ व्या आदी मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत गणपतराव साखरे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात दि.१ सप्टेंबर रोजी पार पडली. धाराशिव शहरातील मराठी गल्लीतील बालाजी मंदिरात या सभेच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कामकाजास सुरुवात करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत साखरे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करताना सभासद, भाग भांडवल, गंगाजळी व इतर निधी तसेच ठेवीमध्ये दरवर्षी समाधानकारक वाढ होत असल्याचे सांगितले. तर संस्थेचे भाग भांडवल २ कोटी २८ लाख ३९ हजार ४०० रुपये राख व इतर निधी ३ कोटी ४० लाख ८९ हजार ५३३ रुपये तसेच ठेवी ३४ कोटी १८ लाख ६५ हजार १४७ रुपये तर २३ कोटी तर गुंतवणूक १७ कोटी २७ लाख २१ हजार रुपये तसेच कर्जे २३९६३ हजार २४२ रुपये खेळते भांडवल ४२ कोटी ९९ लाख हजार ३२० रुपये इतके असून संस्थेला सर्व तरतुदी वजा जाता ५३ लाख ३६ ६८५ रुपये नफा झाला असल्याचे त्यांनी सांगितले. तर संस्था धाराशिव शहर व तालुक्यातील पतसंस्थेचे सभासद असणारे व्यवसायिक, शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेला मदतीचा हात देण्याचे मोलाचे कार्य गेल्या ३५ वर्षापासून करीत असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या सभासदांना ९ टक्के लाभांश जाहीर केला. यावेळी ज्येष्ठ सभासदांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तर सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सभेसाठी मधुकर जाधव, जिल्हा सहकार विकास अधिकारी यांनी कर्ज वाटप, कर्ज वसुली व संस्थेने करावयाची गुंतवणूक आदीबाबत मार्गदर्शन केले. सभेसाठी उपस्थित असलेले ॲड रवींद्र कदम, बार असोसिएशन जिल्हा न्यायालयाचे माजी अध्यक्ष पी.एन. चव्हाण माजी प्राचार्य छत्रपती शिवाजी हायस्कूल धाराशिव यांनी ही संस्थेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. सभेस शेषराव जगताप, नवनाथ राऊत, सुधाकर झोरी, संतोष आडवाणी, ॲड काजळे यांच्यासह संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन व्यवस्थापक नवनाथ बचाटे यांनी तर आभार हनुमंत महाळंगकर यांनी मानले. सभेचे कामकाज पार पाडण्यासाठी संस्थेचे कर्मचारी दीपक देवकते, सुलक्षणा माने, योगेश भोसले, स्वप्निल आहेर, ओंकार जगताप, श्याम साखरे, संक्षेप ठेव प्रतिनिधी जितेंद्र झाडे, चंद्रकांत इंगळे, हरिभाऊ उंबरे, महेंद्र उंबरे, बालाजी सुर्यवंशी, नितीन जामगे, श्रीधर पाटील यांनी सहकार्य केले.

## पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी - डॉ पाटील



धाराशिवदि.३ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात ३० ऑगस्ट पासून अतिवृष्टी व सततचा पाऊस झाल्यामुळे जिल्ह्यात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे तात्काळ पंचनामे करुन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार तसेच मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, पावसाने वार्षिक सरासरी ओलांडली असून मागील तीन दिवसात एकूण सलग ३८ तास पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे तात्काळ पंचनामे करुन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई द्यावी अशी मागणी डॉ पाटील यांनी केली आहे.

# महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सखी सावित्री समित स्थापन



धाराशिव दि.३ (प्रतिनिधी) - श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सखी सावित्री समित स्थापन दि.३ सप्टेंबर रोजी करण्यात आली.

या समितीद्वारे प्रशालेतील विद्यार्थांच्या आरोग्यासाठी शिबीरे आयोजित करणे, कोणत्याही अत्याचाराला विद्यार्थी बळी पडणार नाही, याची खात्री देणे, शाळेतील विद्यार्थ्यांना अत्याचाराबाबत तक्रार करण्यासाठी पोस्को कायद्यातील ई बॉक्सची माहिती देणे, चिराग ॲप, १९०८ या चाईल्ड हेल्पलाईनबद्दल माहिती देणे, शाळेत समतेचे वातावरण रहावे यासाठी लिंगभेद विरहीत व सर्व समावेशक उपक्रम राबविणे, त्यांच्या शारीरिक, भावनिक व बौद्धीक विकास तसेच त्यांच्यावरचा ताण कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांचे व पालकांचे समुपदेशन करणे. त्याचबरोबर सजग पालकत्वासाठी कार्यशाळेचे आयोजन करणे या सारख्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी प्रशालेत करण्यासाठी समितीतील सर्व सदस्यांनी तत्पर रहावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष कुमार निकम यांनी केले. यावेळी या समितीतील सदस्य आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या सरचिटणीस प्रेमाताई पाटील, पोलीस उपनिरीक्षक अनघा गोडगे, तज्ञ विधिज्ञ तेजश्री पाटील, महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपीका सस्ते, डॉ. आरती डंबळ, पर्यवेक्षिका बी.बी. गुंड, समुपदेशक पी.बी. मेटे, ए.ए. देशमुख, एम.एम. धावणे, एस.डी. बिरगड तसेच विद्यार्थी प्रतिनिधी व प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम व समितीचे कार्यवाह रामेश्वर सिरसट आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील अपघातात १७ टक्क्यांनी घट

### मृत्युचे प्रमाणही घटले

धाराशिव दि.३ (प्रतिनिधी) - जिल्हयातील जास्त मृत्यू होणाऱ्या रस्त्यावर अपघाताचे स्थळ व रस्ता याचे मॅपींग करुन स्थळे निश्चित करण्यात आली होती.अशा वारंवार होणाऱ्या अपघात प्रवण क्षेत्रात असुरक्षित जागा असल्याचे दिशादर्शक लावण्यात आले आहेत. तसेच रस्ता सुरक्षिततेबाबत जनजागृती केल्याने जिल्हयातील अपघातांच्या प्रमाणात १% टक्के घट झाली असून अपघातात मृत्यू होण्याचे प्रमाणही घटले आहे.जिल्हयात रस्ता सुरक्षा उपाययोजनेसाठी स्वतंत्रपणे जिल्हा रस्ता सुरक्षा उपाययोजना सुरु करण्यात आली आहे.यातून नागरिकांना रस्ता सुरक्षेबाबत विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.यामध्ये रस्ता सुरक्षा हॉल, रस्ता सुरक्षा जनजागृती मोहिम, संगणक प्रणालीसह मोबाईल व्हॅन, रस्ता सुरक्षा बॅनर,शाळकरी मुलांसाठी रस्ता सुरक्षा पुस्तक,उत्तल आरसा, रस्त्याच्या डाव्या बाजूने चाला आदी बाबींचा समावेश आहे.या माध्यमातून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने जनजागृती केल्याने जिल्हयात होणाऱ्या अपघातात घट झाली आहे.जानेवारी २०२४ ते जून २०२४ पर्यंत जिल्हयात एकूण २८३ अपघात झाले.तर अपघातांची हीच संख्या जानेवारी २०२३ ते जून २०२३ मध्ये ३५४ इतकी होती.तर २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये जवळपास १% टक्क्यांनी अपघाताचे प्रमाण घटले आहे. तसेच अपघातात मृत्यू होण्याचेही प्रमाण घटले असून सन २०२३ मध्ये ३५४ अपघातात १३३ पुरुष तर २५ महिला असे १५८ जणांचा मृत्यू झाला होता.तर सन २०२४ च्या जानेवारी ते जून या सहामाहीमध्ये २९३ अपघातात १३२ पुरुष आणि २० महिला असे १५२ मृत्यू झाले आहेत.या सहा महिन्यात सन २०२३ च्या जानेवारी ते जून या सहा महिन्यातील मृत्यूमध्ये सन २०२४ मधील सहामध्ये जवळपास ३.%९ टक्क्याची घट झाली आहे.जानेवारी २०२३ ते जून २०२३ या सहामाहीत अपघातात गंभीर जखमी होणाऱ्यांचे प्रमाण २१.५८ टक्क्यांनी कमी झाले आहे.यामध्ये सन २०२३ मध्ये २२४ पुरुष तर ६८ महिला असे २९२ जण गंभीर जखमी झाले होते.

# अतिवृष्टीच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी

धाराशिव दि.३ (प्रतिनिधी) - मागील दोन - तीन दिवसांपासून जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टीने झोडपले आहे. त्यामुळे ओढा, नदी व नाल्यांना पूर येऊन शेतात उभे असलेली पिके पाण्याखाली आली. तर शेतातील बांध देखील पाण्याने फुटून शेतातील उभ्या असलेल्या पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या तडाख्याने हिरावून नेला आहे. त्यामुळे शेतकरी हतबल झाला असून या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी धाराशिव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून त्यांना मदत देण्यासाठी पावले उचलावीत, अशी मागणी धाराशिव तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने धाराशिव तालुकाध्यक्ष विनोद वीर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्ते व शेतकरी यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दि.३ सप्टेंबर रोजी केली आहे.दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात अतोनात नुकसान झालेले आहे. त्यामुळे त्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत अशी मागणी केली आहे. यावेळी धाराशिव तालुकाध्यक्ष विनोद वीर यांच्यासह सलमान शेख, सुभाष हिंगमिरे, अरुण कोळगे, बालाजी माने, रघुनाथ आकोस्कर, दयानंद केसकर, बंडू बैरागी, आशिष गवळी, गोविंद उंबरे, रमेश आकोसकर, दादासाहेब आकोसकर, बाळासाहेब आकोसकर, बाळासाहेब आकोसकर, राम पेंढारकर, चैतन्य ढोबळे, आशिष गवळी, अक्षय वीर आदींसह शेतकरी उपस्थित होते




# कळंब येथील धाराशिव जिल्हा अजिंक्यपद कराटे स्पर्धेस प्रतिसाद



कळंब दि.३ (प्रतिनिधी) - कळंब येथील तालुका क्रीडा संकुलात धाराशिव जिल्हा ॲम्युचर स्पोर्ट कराटे असोसिएशन व महाराष्ट्र कराटे असोसिएशन संलग्न महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कराटे अजिंक्यपद स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धेतील विजयी खेळाडूंची पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. सहभागी व विजयी खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी सरस्वती बोदर, प्रकाश भडगे, बंडू ताटे, राहुल हौसलमल, धनंजय ताटे, कराटे असोसिएशनचे लहू पारवे आदी उपस्थित होते. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी माधवी तौर, सुदर्शन आव्हाड, प्रथमेश कांबळे, रफिक पिंजारी, मनोज पतंगे, दादा वाघ, आकाश ढवळे, भीमराज शिंदे, वेदांती पारवे यांनी परिश्रम घेतले.

## सण-उत्सव काळात प्रत्येकाने जबाबदाऱ्या पार पाडाव्यात - डॉ.ओंबासे



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) - येत्या काही दिवसांत जिल्ह्यात गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण उत्सव साजरे करण्यात येणार आहे. हे सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी या काळात जिल्ह्यात जातीय सलोखा, शांतता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रत्येकाने आपाआपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पार पाडाव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी दि.३१ ऑगस्ट रोजी दिल्या.जिल्ह्यात आगामी काळात साजरा होणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या सणानिमित्त जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन, उपजिल्हाधिकारी संतोष भोर, उपविभागीय अधिकारी संजयकुमार डव्हळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यात ७ ते १७ सप्टेंबर या कालावधीत श्री.गणेशोत्सव आणि १६ सप्टेंबर रोजी ईद- ए- मिलाद हे सण साजरे होणार आहेत. या सण-उत्सव काळात जातीय सलोखा, शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी या दृष्टीने सर्वांनी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी केले. ईद-ए-मिलाद जुलूस कमिटी धाराशिव शहर यांनी दि. १६ सप्टेंबर रोजी जुलूस मिरवणूक न काढता दि.१९ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जननंतर मिरवणूक आयोजित केली आहे.

त्यामुळे प्रशासनावरील ताण कमी होऊन दोन्ही सण-उत्सव शांततेत पार पडणार आहेत. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. ओम्बासे यांनी जुलूस कमिटीचे कौतुक केले.

तर डॉ ओंबासे व जाधव यांनी सर्वांना गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार, विविध गणेश मंडळाचे अध्यक्ष तसेच ईद-ए-मिलाद कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.



# सामाजिक न्याय, राजकीय भागीदारीसाठी लातुरात दलित, मुस्लीम,ओबीसी ऐक्य परिषद शनिवारी आयोजन

प्रतिनिधी/ लातूर: जातीयवादी, धर्मांध विचारधारेने भारताची लोकशाही, संविधान आणि धर्मनिरक्षता धोक्यात आणली असून, अशा निर्वाणीच्या परिस्थितीत बुध्दीवादींनी आवाज उठविणे काळाची गरज आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील पुरोगामी-परिवर्तनवादी विचारसरणीच्या मंडळींनी जी २४ नावाने संघटन उभे केले आहे. संघटनेच्या उद्देशानुसार संविधानातील सामाजिक न्याय आणि बहुजन समाजाला राजकीय भागीदारी मिळवून देण्यासाठी शनिवार, दि. ०७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता येथील दयानंद सभागृहात दलित, मुस्लीम, ओबीसी ऐक्य परिषद आयोजित करण्यात आल्याची माहिती जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, यु.डी. गायकवाड, आणि सेवानिवृत्त न्यायाधीश आर. वाय. शेख यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

प्रा. साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती समारोप कार्यक्रमानिमित्त आयोजित या परिषदेचे उद्घाटन जेष्ठ पत्रकार निरंजन टकले (नाशिक) यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी यु.डी. गायकवाड राहणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तीन सत्रात चालणाऱ्या कार्यक्रमात मराजकारणाचे संघीकरण आणि ओबीसी राजकारणापुढील दिशाफ विषयावर दिल्ली विद्यापिठातील प्रोफेसर रतनलाल आपले विचार मांडणार आहेत तर प्रा. सुभाष भिंगे अध्यक्षस्थानी असणार आहेत. विलास माने आणि एन.डी. राठोड प्रमुख पाहुणे राहणार आहेत. दुसऱ्या सत्रात ममुस्लीम समाजाची राजकीय भागीदारी: भ्रम, वास्तव आणि आव्हानेफ विषयावर माजी पोलीस महासंचालक अब्दुर रहेमान शेख (मुंबई) भाष्य करणार आहेत. माजी न्यायाधिश आर. वाय. शेख यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सत्रात अफजल कुरेशी, मौलाना आसिफ मुस्तफा प्रमुख पाहुणे राहणार आहेत. प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या समारोपीय सत्रात मडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खुले पत्र आणि दलित राजकारणाचे बदलते आयामम विषयावर आंबेडकरी नेते श्याम दादा गायकवाड (अंबरनाथ, ठाणे) विचार मांडणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ.आर.डी. निदुरकर, अजित शिंदे आणि आर.डी. जोगदंड आदींची उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जी २४ चे कार्यकर्ते नरसिंग घोडके, आदिवासी नेते रामराजे आत्राम, बरकत काझी, मौलाना इब्राहिम ईसाकी, मौलाना असिफ मुस्तफा, प्रा.डॉ. अशोक नारनवरे, प्रा. अर्जुन जाधव, इंजि. श्रीधर शेवाळे, प्रा.डॉ. मारोती गायकवाड, प्रा.डॉ. निशिकांत वारभूवन, ॲड. बालाजी गाडेकर, ॲड. विजयकुमार चिखलीकर, ॲड. वसंत उगले, पद्माकर वाघमारे, ॲड. मंचकराव डोणे, ॲड. दिपक साठे, अजित निंबाळकर, प्रा. युवराज वाघमारे, पांडूरंग देडे, प्रा. बळीराम मोठेराव, दयानंद राठोड, प्रताप माने-पाटील, लक्ष्मी कांबळे, महानंदा शेवाळे, सुधाताई कांबळे आदींनी केले आहे.

# भारतातील युवा लोकसंख्या हे भारताचे बलस्थान : डेव्हिड कॉंग की

सोलापूर : भारती विद्यापीठ अंतर्गत अभिजीत कदम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्सेस सोलापूर तर्फे नुकतेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ यावर्षी एम.बी.ए, एम.सी.ए., बी.बी.ए. व बी.सीए. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दक्षिण कोरियातील अन्सर डॉट को लिमिटेडचे व्हाईस प्रेसिडेंट डेव्हिड कॉंग की व अपोलो हॉस्पिटल सोलापूरचा संचालिका डॉ. मीनल चिडगुपकर हे लाभले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला इन्स्टिट्यूट चे संचालक प्रा. डॉ. एस. बी. सावंत यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले व आपल्या स्वागतपर भाषणामध्ये त्यांनी इन्स्टिट्यूट तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर इन्स्टिट्यूट चे प्राचार्य डॉ. पी. पी. कोठारी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली व कार्यक्रम करण्यामागचा हेतू विशद केला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय एम.बी.ए.विभाग प्रमुख प्रा. सी.आर. सूर्यवंशी यांनी करून दिला.

प्रमुख पाहुणे डेव्हिड कॉंग की यांनी आपल्या भाषणामध्ये



भारतातील युवा लोकसंख्या हे भारताचे बलस्थान असून भारताची भक्कम अर्थव्यवस्था व दक्षिण कोरियातील तंत्रज्ञान यामुळे दोन्ही देशांमधील व्यवसाय वृद्धिंगत झाला असल्याचे सांगितले. दक्षिण कोरिया मध्ये अनेक भारतीय राहत असून त्यांनी भारतीय संस्कृती संस्था स्थापन केलेली आहे ज्याद्वारे विविध सण वार उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. सन २०३० पर्यंत निर्यात करणाऱ्या देशांच्या यादीमध्ये भारत हा पहिल्या पाच मध्ये असेल असे त्यांनी यावेळी सांगितले. दुसऱ्या प्रमुख पाहुण्या डॉक्टर मीनल चिडगुपकर यांनी आपल्या भाषणामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमात नीती मूल्यांचा समावेश करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी फक्त नोकरीचा विचार न करता उद्योजकतेकडे ही वळावे असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकार द्वारे उद्योजकता विकासासाठी विविध योजना उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले ज्यामध्ये युवा उद्योजकांना अल्पदरात कर्ज तसेच उद्योजकता वाढीसाठी मोफत प्रशिक्षण दिले जाते असे सांगितले. सोलापूर हे शैक्षणिक हब होत असून विविध युनिव्हर्सिटी व महाविद्यालयांच्या माध्यमातून उच्च दर्जाचे शिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. सोलापुरातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी इतर शहरांमध्ये न जाता सोलापुरातील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा तसेच या विद्यार्थ्यांना सोलापुरातच रोजगार उपलब्ध झाला तर सोलापूरचे ब्रेन ड्रेन थांबेल,सोलापूरची आर्थिक स्थिती सुधारेल व सोलापूरला गत वैभव मिळेल असे त्यांनी यावेळी सांगितले. भारती विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन एम. सी. ए. विभाग प्रमुख डॉ. एम. के. पाटील यांनी केले यावेळेस एम.बी.ए., एम.सी.ए.,बी.बी.ए. व बी. सी. ए. या अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाचे विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जात धर्म नाकारणारे :प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के

अहमदपूर दि.०३ (बालाजी कारामुंगीकर) साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य मानव जातीच्या कल्याणाचे साहित्य असुन जाति व्यवस्था नष्ट कराणारं साहित्य असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी केले.




ते अंबेजोगाई येथे जोशाबा बचत गटाच्या वतीने आयोजित साहित्यत्न, लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बचत गटाचे अध्यक्ष तुळशीराम दगडू जोगदंड हे होते तर यावेळी मंचावर डॉ. दयानंद मस्के हे व्याख्याते म्हणुन उपस्थित होते.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के म्हणाले की, आपल्या साहित्याच्या माध्यमातून डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी अस्पृश्यतेच्या नर्काला आग लावली आहे. डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी मानसांच्या वेदनेचे साहित्य लिहिले. सर्वसामान्य माणसांच्या जीवनातील व्यथा स्वत: डोळ्यांनी पाहिल्या आणि जे पाहिलं ते अण्णा भाऊंनी वास्तव साहित्यात मांडलं आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून त्यांनी कामगारांचा सर्वसमावेशक प्रश्न मांडला. आज कामगारांचे अनेक कायदे करत असताना अण्णा भाऊंच्या कामगार विषयक विचारांचा आदर्श घेतला जातो. अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यातून जात नाकारलेली आहे. विविध जाती धर्माचे नायक त्यांच्या कथा कादंबऱ्यात आढळतात. माणसांना माणूसकी बहाल करणारे अनेक प्रसंग त्यांनी साहित्यातून चित्रित केले आहे. माझा रशियाचा प्रवास या प्रवास वर्णनात अण्णा भाऊंचे देशप्रेमासोबतच वैश्रिवक प्रेम जाणवते. रशियातील विविध लहान-लहान प्रसंगातून अण्णा भाऊंनी वाचकांवर सुसंस्कारांची उधळण केलेली आहे. अण्णा भाऊंच्या साहित्याशिवाय मराठी साहित्य पुढे जावू शकत नाही. माणसांच्या वेदनेवर अगदी मनातून लेखन करणारे अण्णा भाऊ हे पहिले जागतिक लेखक आहेत असेही ते शेवटी म्हणाले. यावेळी डॉ. दयानंद मस्के यांनीही अण्णा भाऊंच्या जीवनावर तसेच सद्य परिस्थितीवर प्रकाश टाकला. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबुराव जोगदंड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय संदिपान हाजारे यांनी करुन दिला. यावेळी विविध क्षेत्रातील यशस्वी मान्यवरांचा सत्कार संपन्न झाला. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जोशाबा बचत गटाचे सचिव बालासाहेब जोगदंड, बाबुराव जोगदंड, बंकट वैरागे, लक्ष्मण खरात, संदिपान हजारे, पांडूरंग गादेकर, साधू गायकवाड, लांडगे सर, अनंत कांबळे, दिक्षांत जोगदंड, भिमाशंकर शिंदे, शिवाजीराव वैरागे, शिवाजीराव जोगदंड, प्रविण दापकेकर आदींनी परिश्रम घेतले.

# १ सप्टेंबरनंतर अर्ज करणाऱ्यांना मुकावे लागणार तीन हजारांना

मुंबई : प्रतिनिधी- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ज्या महिलांनी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज दाखल केला, त्यांना जुलै आणि ऑगस्ट अशा दोन महिन्यांचा निधी एकत्रित मिळणार आहे. पण ज्या महिला ही तारीख चुकवतील,१ सप्टेंबरनंतर अर्ज करतील त्या महिलांना मात्र जुलै आणि ऑगस्टचे पैसे मिळणार नाहीत. त्यांना या ३ हजार रुपयांना मुकावे लागणार आहे, असे अदिती तटकरे यांनी नमूद केले. यापुढे ज्या महिन्यात महिला नोंदणी करतील, त्याच महिन्यापासून त्यांना लाभ मिळणार आहे,असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यात महायुती सरकारने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला अल्पावधीतच मोठा प्रतिसाद मिळाला आहे. लाडकी बहीण योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना शासनातर्फे दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत.

यापूर्वी लाडकी बहीण योजनेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली होती, मात्र आता ती मुदत वाढवून ३० सप्टेंबरपर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे महिलांना अजूनही अर्ज करता येणार आहे. मात्र याच दरम्यान महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी या योजनेसंदर्भात एक महत्त्वाची माहिती दिली आहे.

३१ ऑगस्टपूर्वी अर्ज केला नसेल तर

लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी करण्यासाठी, अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट ही शेवटची तारीख नव्हती, त्या तारखेनंतरही ज्या महिला अर्ज भरतील, नाव नोंदणी करतील त्यांना त्या महिन्यापासून लाभ मिळेल, असे अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले.

## टी. सी. व इतर कागदपत्रे हरवले आहेत

नेताजी सुभाषचंद्र बोस ज्युनिअर कॉलेज किनगाव ता . अहमदपूर , जि . लातूर या विद्यालयाची गोंडणार सुनील राम या नावाची इयत्ता बारावी सायन्स पास ची टी. सी. तसेच दहावी सनद ,बारावी सनद व गुणपत्रक किनगाव ते लातूर बस प्रवासादरम्यान हरवले आहे . कोणाला सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा. मोबाईल नंबर ९९७५२९५७३३

## पान १ वरून

### लोकांकडील...

वाढल्याचे ते म्हणाले.

कोरोनानंतर कुटुंबांची भौतिक बचतही जीडीपीच्या १२ टक्क्यांपेक्षा जास्त झाली आहे. २०१०-११ मध्ये हा आकडा जीडीपीच्या १६ टक्क्यांवर पोहोचला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारताला विकसित देश बनविण्याचे स्वप्न पुढील दशक हे वेगवान आर्थिक विकास दराने जायला हवे. तरेच २०४७ ला हे स्वप्न पूर्ण होईल असेही पात्रा यांनी स्पष्ट केले.

### आंदोलन...

कामगार संघटनेला लागलेला डाग आहे. कामगार चळवळीला डाग आहे अशी बोचरी टीका संदीप शिंदे यांनी केली. तसेच एसटी कामगारांचे वेतन वाढले पाहिजे त्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

### श्री. दिलीपराव...

पारदर्शकता एफ.आर.पी सहीत शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याचा प्रयत्न करून जिल्ह्यांत आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे काम या मांजरा साखर परिवारातील सर्व साखर कारखान्याने केलेले आहे मांजरा साखर परिवारातील सर्व साखर कारखाने राज्यात नावलौकिक मिळवलेले आहेत हा मानाचा पुरस्कार आपल्या लातूरच्या शिरपेचात आणखी तुरा माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्यामुळे रोवला गेला आहे

लातूरकराकडून लवकरच नागरी सत्कार

लातूर शहरातील सर्व क्षेत्रातील कार्य करणाऱ्या सर्व संवेदशिल लातूरकरांनी एकत्रित येऊन नागरी सत्कार कमिटी केलेली असून या कमिटीच्या वतीने लवकरच माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा नागरी सत्कार करण्यात येणार असून यासाठी एक स्वतेंत्र नागरी सत्कार समिती नेमण्यात आली आहे त्या कमिटीच्या वतीने मंगळवारी आशियाना बंगल्यावर माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ व संत तुकारामांची गाथा देवुन कमिटीचे सदस्य खासदार डॉ शिवाजीराव काळगे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमन लाहोटी,सुपर्ण जगताप, शिवाजी कांबळे अँड कालिदास देशपांडे, आय एम आय चे अध्यक्ष डॉ उमेश कानडे,अँड उदय गवारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी डॉ सुरेश वाघमारे, डॉ अशोक पोतदार, डॉ सतीश बिराजदार, सुनिल कोचेटा, जयप्रकाश दगडे, पापासेठ ताथोडे,विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ उदय मोहिते, डॉ कल्याण बरमदे, रमेश बियाणी, धनराज बरुरे,अभय शहा, सत्तार पटेल, झकी कायमखानी,अँड योगेश जगताप, डॉ रमेश भराटे, डॉ दीपक गुगळे, डॉ आनंद पाटील, अमृत सोनवणे, डॉ गिरीश कोरे, डॉ राहुल सुळ, डॉ अजय जाधव, शशिकांत पाटील, डॉ संजय वारद, डॉ संजय पौल पाटील, राजेश दराडे, शरद देशमुख, डॉ दाताळ, प्रा.माधव गादेकर , चंद्रकांत साळुंखे, प्रमोद सुपर मार्केटचे भूषन दाते, विक्रम ब्रिजबासी, चंद्रकांत साळुंखे, संजय सावंत, रामभाऊ चलवाड, रामदास पवार राहूल लोंढे बाळकृष्ण धायगुडे आदि उपस्थित होते.

नागरी सत्काराला माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून होकार

मंगळवारी लातूरकर यांचेकडून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी घेवून आदरणीय साहेब यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले त्यानंतर मनोगतात माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब म्हणाले की तुम्ही सगळे लातूरकर माझ्यावर अंतःकरणातून प्रेम करणारी मंडळी मोठ्या संख्येने ईथे आलात तुमचं प्रेम माझ्यावर असल्याने माझा सन्मान केला त्याबद्दल आभार व्यक्त करत सर्वांच्या प्रेमाखातर माझा लातूरकराकडून नागरी सत्कार आयोजीत केला आहे त्यासाठी सत्कार कमिटीने विनंती केली आहे त्या सोहळ्याला होकार देत लातूरकरांच्या वतीने माझा नागरी सत्कार सोहळ्यास मी होकार देत असून मी निश्रिचतपणे उपस्थित राहणार आहे. असे यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी सांगितले

### वीरशैव...

- भक्तीस्थळ ते शक्तीस्थळ - श्रीक्षेत्र मंगळवेढा अशी सम्पन्न होईल.

दि. ५ सप्टेंबर २०२४. रोजी मा. खा. अजितजी गोपछडे यांच्या खासदार निधीतून राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज भक्तीस्थळावरील सुशोभीकरण व विविध विकास कामांसाठी भक्तीस्थळ, राजूर (अहमदपूर) येथून ३१ लक्ष रुपये निधी देऊन सन्मान यात्रेचा शुभारंभ करणार आहेत.

### अतीवृष्टी आणि...

नांदेड शहरातील पाकीजा नगर, बिलाल नगर, लक्ष्मी नगर, गौतम नगर, खडकपुरा भागात जाऊन , गोदावरीचे पाणी वस्तीत घुसून झालेल्या नुकसानीची पाहणी केली, अपतग्रस्तांशी संवाद साधला, त्यांना धीर दिला, प्रशासनाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत, अशा सूचना दिल्या. अपदग्रस्तांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असे आश्र्वासन दिले.

यावेळी नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मिर्झा फरदतुला बेग, नांदेड शहर काँग्रेसचे अध्यक्ष अब्दुल सत्तार, २१ शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, लोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शरद पवार, कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बालाजी पंडागळे, राहुल हंबर्डे, विठ्ठल पावडे दिलीपराव पाटील बेटमोगरेकर, अण्णासाहेब पवार, सतीश देशमुख, पप्पू कोंडेकर, तिरुपती कोंडेकर आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

त्यानंर माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रभारी सचिन नाईक, हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दिलीपराव देसाई यांच्यासह हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात डोंगरगाव (पूल) येथे जाऊन शेती पिकाची तसेच, पुराने नुकसान झालेल्या घरांची पाहणी केली. कळमनुरी तालुक्यातील डोंगरगाव (पूल) येथील निलाबाई बरगे यांच्या घरामध्ये पुराचे पाणी जाऊन मोठे नुकसान झाले. त्यांच्याशी व इतर सर्व नागरिकांशी आमदार देशमुख यांनी संवाद साधून त्यांना धीर दिला. नुकसानग्रस्ताच्या सोबत काँग्रेस पक्ष कायम उभा आहे अशी ग्वाही दिली. यावेळी कळमनुरीच्या नायब तहसीलदार डॉक्टर सीमा कांदे मंडळ अधिकारी शिल्पा सरकटे तलाठी विनोद ठाकरे वसमत तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाराम खराटे शहराध्यक्ष अलीमुद्दीन शेख डोंगरगावचे सरपंच अभिजीत देशमुख एम.आर कॅंतमवार, सुधीर सराफ सुरेश कांडलीकर, जे.के कुरेशी आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. माजी मंत्री आमदार देशमुख यांनी माजी आमदार भाऊराव पाटील व काँग्रेस पदाधिकारी यांच्यासह हिंगोली नजीकच्या आझम कॉलनी तसेच सेनगाव तालुक्यातील हनागदरी येथे भेट देऊन अतीवृष्टीने नुकसान झालेली पाहणी केली, नागरीकांशी संवाद सांधला.

### विधानसभा जिद्दीने...

यथोचित सत्कार करून स्वागत केले.

राज्यात आपला मुख्यमंत्री नसला तरी मोठा भाऊ या भूमिकेतून काम करीत आहोत. येणाऱ्या विधानसभेची निवडणूक महायुतीच्या माध्यमातूनच लढणार असल्याचे सांगून ना. मुरलीधर मोहोळ म्हणाले की, बूथ प्रमुखाची मोठी जबाबदारी आहे. जुन्या नव्या कार्यकर्त्यांचा त्याचबरोबर लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांचा समन्वय साधून काम करावे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून केंद्र आणि राज्य शासनाचे कल्याणकारी निर्णय सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचवावे अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी ना. मोहोळ यांनी उपस्थित भाजपा पदाधिकाऱ्यांकडून मते जाणून घेतली आणि आगामी काळातील विधानसभा निवडणुकीची रणनीती काय असेल याबाबत मार्गदर्शन केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात गेल्या पंधरा-वीस वर्षात कार्यकर्त्यांच्या मेहनतीतून काँग्रेसचे अस्तित्व नष्ट करण्याचे काम केले असून या मतदारसंघातील ७० टक्के ग्रामपंचायती आजही भाजपच्या ताब्यात आहेत. या मतदार संघातील बहुतांशी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती जागेवर घवघवीत यश संपादन करून रेणापूर नगरपंचायतीवर भाजपाने झेंडा फडकला असे सांगून या बैठकीत बोलताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्र शासन आणि राज्यातील महायुती शासन यांच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात विकासाच्या विविध योजना राबविण्यात आल्या अनेक कामांना निधी मोठ्या प्रमाणात मिळवून दिला एकूणच मतदारसंघात कार्यकर्त्यांची मजबूत फळी असून पक्षाचे चांगले संघटन उभे केले आहे. मागील विधानसभा निवडणुकीत निवडून येणारी लातूर ग्रामीण ची जागा अचानकपणे शिवसेनेला दिली यावेळी भाजपाची असलेली जागा भाजपालाच ठेवून कार्यकर्त्यांना बळ आणि प्रोत्साहन द्यावे असे बोलून दाखविले.

भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी उपस्थित यांचे आभार मानले. प्रारंभी रेणापूर तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविकात मतदार संघाची संघटनात्मक बांधणी सांगून आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. बैठकीचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या बैठकीस पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापुरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जिल्हा भाजपाचे हनुमंतबापू नागटिळक, सतीश आंबेकर, वैभव सापसोड, वसंत करमोडे, पद्माकर चिंचोलकर, राजकिरण साठे, सुरज शिंदे, अल्पसंख्यांक सेलचे रशीद पठाण, महिला आघाडीच्या ललिता कांबळे, लता भोसले, अनुसया फड, सुरेखा पुरी, शीला आचार्य, जणाबाई साखरे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी भाजपासह विविध आघाडी मोर्चाचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा रुग्णालयासाठी...

ओळखून महाजन यांनी राज्याचे मुख्य आरोग्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्याशी फोनवर संपर्क साधला आणि कुठल्याही परिस्थितीत निधी उपलब्ध करून तो कृषी विभागास वर्ग करावा असे आदेश दिले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनाही फोन करून निधी उपलब्ध होत नसेल तर विना मोबदला जमीन हस्तांतरण करून द्यावी अशी मागणी केली. असा प्रस्ताव आरोग्य विभागाने सादर करावा आम्ही विना मोबदला जमीन हस्तांतरण करून देऊ असे आश्वासन मुंडे यांनी दिल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, तहसीलदार सौदागर तांदळे यांची उपस्थिती होती.

एकूणच या विषयावर लातूरच्या नागरिकांतून वाढत चाललेला रोष आणि दबाव पाहता येत्या काही दिवसात हा प्रश्न मार्गी लागेल असा विश्वास माझं लातूर परिवाराने व्यक्त केला आहे. शिष्टमंडळात डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर, सतीश तांदळे, दिपरत्न निलंगेकर, अभय मिरजकर, डॉ सितम सोनवणे, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, काशिनाथ बळवंते, उमेश कांबळे, गोपाळ झंवर, संजय स्वामी यांचा समावेश होता.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com



# चंदेरी दुनिया




## कंगना राणावतचा 'इमर्जन्सी' झाला पोस्टपोन, साऊथच्या या दोन चित्रपटांना लागली लॉटरी

मुंबई -कंगना राणावतचा 'इमर्जन्सी' हा चित्रपट ६ सप्टेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार होता, तो आता होताना दिसणार नाही. १ सप्टेंबरच्या संध्याकाळी चित्रपट पुढे ढकलल्याची बातमी समोर आली. या चित्रपटात शिखांना चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आले आहे, अशी याचिका पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. पंजाबमध्ये चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्याचीही मागणी होत आहे.वादांमुळे हा चित्रपट पुढे ढकलण्यात आला आहे. आता हा चित्रपट चित्रपटगृहात कधी येणार? याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. कंगनाचा हा चित्रपट पुढे ढकलल्यामुळे आता साऊथच्या दोन मोठ्या चित्रपटांना फायदा होणार आहे. ते दोन चित्रपट कोणते आहेत आणि ते कसे फायदेशीर ठरतील, जाणून घेऊया.

१. गॉट – या यादीतील पहिला चित्रपट म्हणजे थलपथी विजयचा 'गॉट', जो एक ॲक्शन साय-फाय चित्रपट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन व्यंकट प्रभू यांनी केले आहे. यात विजय दुहेरी भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर १७ ऑगस्ट रोजी रिलीज झाला होता, जो लोकांना खूप आवडला होता. या चित्रपटाचा ट्रेलर आल्यापासून चाहत्यांमध्ये या चित्रपटाची उत्सुकता आहे. हा चित्रपट ५ सप्टेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. तमिळ आणि तेलुगूसोबतच हा चित्रपट हिंदीतही प्रदर्शित होणार आहे.

अशा परिस्थितीत कंगनाचा 'इमर्जन्सी' ६ सप्टेंबरला रिलीज झाल्याने हिंदीतील 'गॉट'च्या कमाईवर परिणाम होऊ शकला असता. मात्र, आता विजयच्या चित्रपटाचा मार्ग मोकळा झाला आहे. या चित्रपटातून विजय लोकांवर काय जादू करतो हे पाहावे लागेल. त्याच्यासोबत मीनाक्षी चौधरी आणि मालविका शर्मा यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.२. थांगलान- या यादीतील दुसरे नाव विक्रमच्या 'थांगलान'चे आहे. या चित्रपटात कोलार गोल्ड फील्डमध्ये काम करणाऱ्या मजुरांची कथा दाखवण्यात आली आहे. १९व्या शतकातील या चित्रपटात विक्रमने आदिवासी समाजाच्या नेत्याची भूमिका साकारली आहे.

१५ ऑगस्टला हा चित्रपट तेलगू, तमिळ, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्ये प्रदर्शित झाला. आता तो ६ सप्टेंबरला हिंदीत प्रदर्शित होत आहे.

'इमर्जन्सी' पुढे ढकलल्यामुळे हा चित्रपट उत्तर भारतातही चांगली कमाई करू शकतो. या चित्रपटात विक्रमसोबत मालविका मोहनन देखील आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी रणजीतने घेतली आहे.

'थांगलान' आधी ३० ऑगस्टला हिंदीत प्रदर्शित होणार होता. पण नंतर निर्मात्यांनी हा चित्रपट ६ सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलला. दरम्यान कंगनाच्या 'इमर्जन्सी'मध्ये इतरही अनेक मोठे कलाकार दिसणार आहेत. महिमा चौधरी, श्रेयस तळपदे, अनुपम खेर, मिलिंद सोमण यांसारखे कलाकार या चित्रपटाचा भाग आहेत. या चित्रपटामध्ये कंगनाने देशाच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. अभिनयासोबतच कंगनाने या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले आहे. सुरुवातीला कंगनाने नोव्हेंबर २०२३ मध्येच हा पिक्चर रिलीज करण्याचा निर्णय घेतला होता, पण नंतर रिलीज पुढे ढकलण्यात आला. त्यानंतर माहिती आली की हा चित्रपट जून २०२४ मध्ये प्रदर्शित होणार आहे. मात्र त्यावेळीही तो होऊ शकला नाही आणि पुन्हा रिलीज पुढे ढकलण्यात आले.

## घड्याळ नेहमी डाव्या हातातच का बांधले जाते? जाणून घ्या याचे उत्तर



घड्याळ हे नेहमी डाव्या हातातच बांधले जाते. मात्र तुम्हाला यामागचे कारण माहीत आहे. लोक अनेक वर्षांपासून असेच घालत आहेत की त्यामागेही काही कारण आहे? सोशल मीडियावर हा प्रश्न विचारण्यात आला. यावर अनेक युजर्सनी वेगवेगळी उत्तरे दिली. मात्र तुम्हाला यामागचे शास्त्रीय कारण माहीत आहे का?

पहिली गोष्ट म्हणजे अधिकतर लोक आपल्या उजव्या हाताने काम करतात. त्यामुळे हा हात सतत व्यस्त असतो. अशातच डाव्या हातात घड्याळ बांधल्याने सतत वेळ बघण्यास त्रास होत नाही. डाव्या हातावर घड्याळ बांधल्याने ते सुरक्षित राहते. तसेच पडण्याचाही धोका नसतो. हेच कारण लक्षात घेता अनेक कंपन्या डाव्या हातावर बांधण्यासाठी घड्याळ बनवतात.

**जाणून घ्या शास्त्रीय कारण–**

लक्ष देऊन पाहिल्यास टेबलावरील घड्याळ नेहमी सरळ असते. स्टँडवर ठेवातचा घड्याळातील १२ हा आकडा नेहमी वर असतो. भिंतीवरही आपण असेच घड्याळ अडकवतो. जर आपण घड्याळ डाव्या हाताऐवजी उजव्या हातावर बांधले तर हा १२ अंक खाली जाईल आणि क्रम उलटा होईल.अशातच तुम्हाला घड्याळाचे वाचन करणे कठीण होईल. जेव्हा ऑटोमॅटिक घड्याळाचा जमाना होता तेव्हा हे घड्याळ लोक दोन्ही हातांवर बांधत होते. उजव्या हातावर बांधताना चावी बाहेरच्या दिशेला जात होती यामुळे चावी देण्यास त्रास होत असे. दरम्यान, डाव्या हातावर बांधल्यास चावी आतल्या बाजूस यायची. आता तुम्हाला याचे खरे कारण समजले असेल.

# चंदेरी दुनिया

## सलमान खाननंतर या प्रसिद्ध गायकाच्या घरावर गोळीबार, घटनेने उडाली खळबळ

मुंबई-गेल्या काही महिन्यापूर्वी सलमान खानच्या घरावर गोळीबार झाल्याचे समोर आले होते. अशातच सलमाननंतर आता प्रसिद्ध गायकाच्या घरावर गोळीबार झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.




या गोळीबार प्रकरणातही लॉरेन्स बिश्नोई गँगचा हात असल्याचे समोर येत आहे.प्रसिद्ध गायक एपी ढिल्लनच्या घरावर फायरिंग झाल्याचे समोर आले आहे. गायकाच्या कॅनडातील व्हॅंकुव्हर येथील घरावर गोळीबाराची घटना घडली. १ सप्टेंबरला ही घटना घडली असून आता याची माहिती समोर येत आहे. घराच्या बाहेर अज्ञात लोकांनी गोळीबार केला आहे. लॉरेन्स बिश्नोई गँगचा यामध्ये हात असल्याचे समोर येत आहे. याविषयी सोशल मीडियावर पोस्टही व्हायरल होत आहे. व्हायरल होत असलेल्या पोस्टमध्ये सलमान आणि ढिल्लनच्या मैत्रीविषयी लिहिले आहे. या पोस्टमध्ये नेमके काय आहे?व्हायरल पोस्टमध्ये लिहिले आहे, ''सर्व भावांना राम राम जी १ सप्टेंबरला कॅनडात दोन ठिकाणी गोळीबार झाला. व्हिक्टोरिया बेट आणि वुडब्रिज टोरंटो दोन्ही ठिकाणच्या गोळीबाराची जबाबदारी मी रोहित गोदारा (लॉरेन्स बिश्नोई ग्रुप) घेतो. व्हिक्टोरिया आयलंडमधील घर एपी ढिल्लनचे आहे. एपी ढिल्लन सलमान खानला आपल्या गाण्यात घेऊन मोठी फिलिंग घेत आहे. तुझ्या घरी आलो होतो की तू बाहेर येतो तुला दाखवतो. ज्या अंडरवर्ल्डची लाईफ ची तुम्ही कॉपी करता ना ते आम्ही प्रत्यक्षात जगत आहोत. आपल्या लायकीत राहा नाहीतर कुत्र्याची मौत मरशील.''

दरम्यान, पंजाबी गायक एपी ढिल्लनच्या घरावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेने आता खळबळ उडाली आहे. त्याचे अनेक गाणी, रॅप ट्रेंडिंग असतात. त्यांचे अनेक चाहतेही आहेत.

# कोकणातला अंतुबर्वा



सुप्रसिद्ध साहित्यिक, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकात त्यांना रत्नागिरीत भेटलेल्या अंतुबर्वा याच्या चिकित्सक आणि तितक्याच बेरक्या स्वभावगुण वैशिष्ट्याचं व्यक्तिचित्रण आहे. पु. ल. देशपांडे या अंतुबर्व्याविषयी मराठी साहित्यविश्वात प्रचंड अप्रुप आहे. कोकणातील माणसांचे स्वभावगुण वैशिष्ट्यच पु.लं.नी या अंतुमध्ये शोधले आहेत. कोकणी माणसाचा तिरकसपणा, कुणाला चांगले म्हणण्यासाठी फारच आढे-वेढे घेण्याचा स्वभाव. असा एकूणच कोकणातील माणसांचा असलेला स्वभाव हा अंतुबर्व्याच्या रूपाने जरी पु.लं.ना रत्नागिरीत भेटला असला तरीही कोकणातील प्रत्येक गावात एकतरी अंतुबर्वा असावा असं वाटते. अंतुबर्वा या मानसिकतेतला गावो-गावी एकतरी माणूस कोकणातल्या गावातून भेटल्याशिवाय राहणार नाही. कोकणात कौतुकाने काही नव्याने करायला जावं किंवा काही नवीन सांगायला जावं तर निश्चितपणे त्याला छेद किंवा विरोध झाल्याशिवाय राहणार नाही.


कोकण ही बुद्धिवंताची खाण म्हणून ओळखली जाते. साहित्य, नाटक, पत्रकारिता, राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक अशा कोणत्याही क्षेत्रात कोकणातील कोणी अग्रभागी नाही असं होऊच शकत नाही. प्रचंड बुद्धिमत्ता आहे; परंतु संयमीपणा नाही. या तिरकसपणामुळे आपलं नुकसान होऊ शकते याची जाणीव कधी-कधी आपणालाच नसते. कोकणातील प्रकल्प, कोकणचा विकास आणि लोकभावना यातली नकारात्मकता यामुळे आजवर नुकसानच झाले आहे. प्रगतीच्या विकासाच्या आड येणारे हे स्वभावगुण आपण बदलले पाहिजेत. एखाद्या मोठ्या विकास प्रकल्पाचा कसा विचका होऊ शकतो, त्यासाठी शिरोडा-वेळागर येथील ताजच्या पंचतारांकित प्रकल्पाचे उदाहरण नजरेसमोर घेता येईल.

गेल्या पंचवीस वर्षांत शिरोडा-वेळागरचा विषय राजकीय इश्यू बनवला गेला. सोईनुसार ज्यांने-त्यांने या विषयाचे राजकारण केले. फक्त विद्यमान केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी शिरोडा-वेळागर येथे पंचतारांकित हॉटेल प्रकल्प व्हावा अशी भूमिका मांडली. सर्व्हेनंबर ३९ वगळावा किंवा कसे हा चर्चेचा संवादाचा विषय होता; परंतु जेव्हा कधी या प्रकल्पाला विरोध होत राहिला त्यामागेही कोणताही चर्चेचा विषय नव्हता. फक्त विरोध करणे एवढीच भूमिका घेण्यात आली होती. कधी विरोध तर कधी प्रकल्पाच्या बाजूने अशा सोयीच्या भूमिका अनेकांनी घेतल्या. विरोध करण्यासाठी माजी आ. कै. पुष्पसेन सावंत, माजी खासदार कर्नल सुधीर सावंत, समाजवादी कार्यकर्ते माजी सभापती जयप्रकाश चमणकर, सर्वच प्रकल्पांना विरोध करणारे खा. विनायक राऊत, आताचे विरोध करणारे माजी आमदार राजन तेली या सर्वांनी आताही विरोधी भूमिका घेतली आहे. जेव्हा-जेव्हा ज्यांना वाटतं शिरोडा-वेळागर प्रकल्पातील सर्व्हे नंबर ३९ वगळला गेला पाहिजे असे वाटणाऱ्यांनी सत्तेच्या काळात कधीच प्रयत्न केल्याचे ऐकिवात नाही. गेली पंचवीस-तीस वर्षे एखाद्या विषयाचे राजकारण फक्त केले जाऊ शकते. हे नको तर काय हवं हे सांगायचं धाडस आणि तसे प्रयत्न कधीच कोणी केले नाहीत. अखंड कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अलीकडचा पालघर जिल्हा या सर्वांकडे पाहिले आणि कोण-कोणते प्रकल्प कोणा-कोणाच्या विरोधी भूमिकेने बासणात गुंडाळले गेले त्यावर जरी एक नजर टाकली तरीही प्रकल्पांना विरोध करणारे कोण आहेत. विरोध करण्यामागची कारणं काय आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या मुळाशी एकच उत्तर मिळेल ते म्हणजे फक्त विरोधासाठी विरोध आणि राजकारण माणसं तीच, चेहरे तेच, मुखवटेही तेच अशा या सर्वांमुळे कोकण विकासापासून दूर नसला तरीही मागे का? या प्रश्नाचे उत्तर आपसूकच मिळून जाते. सकारात्मकतेने विचार करण्याची कुणाचीही मानसिकता नाही. राजकीय फायद्या-तोट्याची गणितं मांडत होणाऱ्या विरोधाने काय नुकसान होतं याचं दुसरं उत्तम उदाहरण म्हणजे चिपी विमानतळ. गोवा राज्यातील आंतरराष्ट्रीय मनोहर विमानतळाची जेव्हा चर्चा नव्हती तेव्हा कोकणातील सिंधुदुर्गात चिपी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा विमानतळ उभा करण्याचा प्रयत्न केला गेला. जेव्हा या चिपी विमानतळ भूमिपूजन समारंभालाच काळे झेंडे घेऊन विरोध झाला.

पुढे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा सद्हेतू ठेवून त्यासाठी आवश्यक असणारी जमीन संपादनाच्या विषयात पेन्सिल नोंदीच नसलेलं भूत उभं केलं गेलं. या विरोधाच्या काळात गोव्यातील मोपा येथे विमानतळाचे भूसंपादन होऊन मोपाला आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरूही झाले. कधीतरी राजकारणापलीकडे सर्व लोकप्रतिनिधी याचा विचार करणार की नाही? प्रकल्पांना विरोध करून एखादी आमदारकी वातावरण बिघडवून पदरात पाडून घेऊ शकते. त्या पलीकडे जाऊन विकासाच काय झालं? काय होणार? यावर जे विरोध करतात, त्यात कुणाची तरी जबाबदारी घेऊन सांगतील काय? कोणताही प्रकल्प किंवा विकासाचा चांगला विचार घेऊन काही चांगलं उभं राहात असेल तर ते मोडून टाकण्यासाठी फार डोकं लावावं लागत नाही. आपल्याकडे कोणतंही मोडून टाकण्यासाठी अनेक डोकी कामाला लागतात; परंतु चांगलं काही उभं राहण्यासाठी आपणाला बदलावं लागेल. पु.लं.च्या व्यक्ती आणि वल्लीमधील तिरकस अंतुबर्वाचा आत्मा आजही गावा-गावांत वावरतोय एवढं मात्र खरं!

**-माझे कोकण: संतोष वायंगणकर**

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# उदगीर तालुका शेकापूर येथे बैलपोळा साजरा



उदगीर (प्रतिनिधी) शेकापूर येथे बैलपोळा साजरा दोन एकर जमिनीमध्ये गणपत सावंत यांनी बैल ठेवून बैलाची झोपण व संगोपन केले आणि त्यांनी मुलांपेक्षा जास्त बैलांची काळजी घेऊन बैलाची जपण करून व प्रभावी महाराष्ट्र याची संस्कृती जपले आणि दोन बैल दोन गाई आणि दोन मशीन त्यांच्याकडे दोन एकर जमिनीमध्ये त्यांनी पालन पोषण करत आहेत यामुळे शेकापूर येथे भाजपा जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण फक्रुलारी भालके यांच्या वतीने सत्कार करण्यात आला शाल श्रीफळ नारळ घेऊन यावेळी माजी तंटामुक्ती अध्यक्ष जनार्दन सावंत ग्राम पंचायत सदस्य अंकुश उन्हाळे काशिनाथ सावंत सुनील जाधव आणि गावातील अन्य नागरिक उपस्थित होते चालू या परिसरामध्ये सर्व कौतुक होत आहे

# वायगाव , बंदई व गाद्याच्या नदीला पुर आल्याने तिरु प्रकल्पात पाणी जमले;हंडरगुळी परिसरातील शेतकरी खुष झाले..

हंडरगुळी (प्रतिनिधी) यावर्षी पावसाळ्याचे तीन महिने झाले तरी ही येथील तिरु म.प्रकल्प हा जोत्याखालीच होता.यामुळे येत्या उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण होऊ शकते.अशी भीती जाणकारांमधून व्यक्त केली जात होती.

मात्र,दि.१ सप्टेंबर रोजी स.८ वा. पासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे हंडरगुळी ते अहमदपुर रोडवर असलेल्या व तिरु म.प्रकल्पा शी जोडलेल्या वायगाव व बंदईसह गाद्याच्या होळास भरपुर पाणी (पुर) आल्याने हे पाणी पुढे तिरु प्रकल्पात जमा झाले.यामुळे पाणी टंचाईची भीती कमी झाली.असे मत मोरतळवाडी ग्राम पंचायतचे माजी सदस्य पिराजी मोरतळे यांनी फक्रोनवरुन व्यक्त केले .

पावसाळ्याचे तीन महिने व म्हत्वाचे नक्षत्र संपले तरीही तिरु नदी व म. प्रकल्पात पाणीसाठा कांही जमला नव्हता.परिणामी जलसंपदा विभागाने हा तिरु मध्यम प्रकल्प जोत्याखाली आहे.अशी नोंद नुकतीच जाहीर केली यामुळे यंदा तिरु जोत्याखालीच राहणार आणी भविष्यात पाणी प्रश्न निर्माण होणार.अशी भीती वाटायची. पण दि.१ रोजी स.८ वा.पासुन ह्या भागात वरुणराजा असा कांही प्रसन्न झाली की तीन महिण्यात पुराचेपाणी न पाहिलेल्या प्रकल्पात तीन घंट्यात बऱ्यापैकी जलसाठा जमा झाला असुन,गादा व वायगाव होळ पाण्याने तुडूंब भरुन त्याचे पाणी तिरु नदी / प्रकल्पात विलीन झाल्याचे दिसत आहे. तसेच अनेकांच्या विहीरींमध्ये व बोअर व आड यामध्ये मोठा साठा जमला असुन,हंडरगुळी व भागात असलेल्या नद्या,नाल्यांना चांगला पुर आज दिसुन आला.म्हणुन शेतकरी व सामान्य जनता खुष दिसत आहेत..



## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६६६/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Ram @ Kushiba Nivratti Kamble हे R/o Nagalgao Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक १०.०३.२०२४ रोजी At. Nagalgao Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Sarjabai W/o. Kushiba Kamble, Age-70, Occu-H.H.
2) Mahadabai W/o Ram Kamble, Age-68, Occu-HH
3) Baliram S/o. Ram Kamble, Age-48, Occu Agri
4) Nirmala W/o. Baburao Gadikar, Age- 46,
5) Arun S/o. Ram Kamble, Age-44 Occu-Agri
6) Parvind S/o. Kushiba Kamble, Age-39 Occu-Agri
7) Babita W/o. Satish Surywanshi, Age-38 Occu- H.H.
8) Shivraj S/o. Ram Kamble, Age-37 Occu- Agri
9) Ravindra S/o Ram Kamble, Age-36 Occu Agri

All R/o. Nagalgao Tq. Udgir Dist. Latur

यांनी खालील नमुद ९ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Sarjabai W/o. Kushiba Kamble | 70 | Wife |
| 2) Mahadabai W/o Ram Kamble | 68 | Wife |
| 3) Baliram S/o. Ram Kamble | 48 | Son |
| 4) Nirmala W/o. Baburao Gadikar | 46 | Daughter |
| 5) Arun S/o. Ram Kamble | 44 | Son |
| 6) Parvind S/o. Kushiba Kamble | 39 | Son |
| 7) Babita W/o. Satish Surywanshi | 38 | Daughter |
| 8) Shivraj S/o. Ram Kamble | 37 | Son |
| 9) Ravindra S/o Ram Kamble | 36 | Son |

अर्जदार यांना Ram @ Kushiba Nivratti Kamble या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Ram @ Kushiba Nivratti Kamble याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०५/१०/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## टि.सी. हरवली आहे

माझी राठोड आशा विजय या नावाची इ. १२ वी पासची टि.सी कौळखेड ते जानापुर प्रवासात दि. १५/०६/२०२४ रोजी हरवली आहे.
जर कोणास साडल्यास संपर्क साधावा.
मो.नं ९६६५९६१५९१

## जाहीरनोटीस

सर्व जनत्तेस कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली मिळकत ही श्री. चँदपाशा बाबु पठाण रा. उदगीर ता. उदगीर जिल्हा लातूर यांच्या मालकिची आहे त्यांनी आमचे आणिल बैंक इक्टिास स्मॉल फायनान्स बँक लि शाखा उदगीर यांचेकडून सदर मिळकतीवर रक्कम रुपये ४,००,०००/- (चार लाख रुपये) कर्ज घेतलेले आहे सदर मिळकत त्यांनी आमच्या आशिल बँक इक्टिास स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा उदगीर यांच्याकडून घेतलेल्या कर्जासाठी दिनांक २७.०८.२०२४ रोजी दुय्यम निबंधक उदगीर यांच्याकडे फायलिंग नंबर १८६/२०२४ अन्वये नोटीस ऑफ इंटिमेशन रितसर नोंदवुन दिलेले आहे त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निर्जोखमी असल्याची आमच्या आशिल बँकेस खात्री व हमी दिलेली आहे. अन्यजणांस कोणत्याही मार्गाने हस्तांतारीत केली नाही अशी खात्री व विश्वास दिलेला आहे. साठेखत, खरेदीदस्त, बक्षीसपत्र, मृत्युपत्र गहान, दान, लिज, लायसेन्स अशा कोणत्याही दस्ताने व कराराने सदर मिळकतीत अन्य कोणाचेही हक्क हितसंबंध निर्माण झालेले नाहीत याची खात्री दिलेली आहे. जर तसे असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

मिळकतीचे वर्णन

मौजे सोमनाथपुर ता. उदगीर येथील सर्वे क २७८/१ प्लॉट क. २२६ न.प.मिक ७-१-१०९४ क्षेत्र १५५० चौ फ्रुट ज्याची चतु सिमा -

पुर्वेस : प्लॉट क २१
पश्चिमेस : ०६ मिटरचा रस्ता
दक्षिणेस : प्लॉट क १९
उत्तरेस : प्लॉट क ३९

येणेप्रमाणे चतुः सिमेतील जागा त्यातील सर्व तद्भुत वस्तुसुध्दा

ही जाहीर नोटीस दिली तारीख ०३-०९-२०२४

अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. एन.एल. मध्वरे,
उदगीर मो.नं. ९४२२२४३५०७

## जाहीरनोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की खाली वर्णन केलेली मिळकत ही श्री. बालाजी गुलाबराव चव्हान रा. सोमनाथपुर ता. उदगीर जिल्हा लातूर यांच्या मालकिची आहे. त्यांनी आमचे आशिल बैंक इक्टिास स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा उदगीर यांचेकडून सदर मिळकतीवर रक्कम रुपये ७,०१,०००/- (सात लाख एक हजार रुपये) कर्ज घेतलेले आहे. सदर मिळकत त्यांनी आमच्या आशिल बैंक इक्टिास स्मॉल फायनान्स बँक लि शाखा उदगीर यांच्याकडुन घेतलेल्या कर्जासाठी दिनांक २६.०८.२०२४ रोजी दुय्यम निबंधक उदगीर यांच्याकडे फायलिंग नंबर १८५/२०२४ अन्वये नोटीस ऑफ इंटिमेशन रितसर नोंदवुन दिलेले आहे त्यानी सदरची मिळकत निर्वेध व निर्जोखमी असल्याची आमच्या आशिल बँकेस खात्री व हमी दिलेली आहे. अन्यजणांस कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत केली नाही अशी खात्री व विश्वास दिलेला आहे साठेखत, खरेदीदस्त, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहान, दान, लिज, लायसेन्स अशा कोणत्याही दस्ताने व कराराने सदर मिळकतीत अन्य कोणाचेही हक्क हितसंबंध निर्माण झालेले नाहीत याची खात्री दिलेली आहे जर तसे असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

मिळकतीचे वर्णन

मौजे सोमनाथपुर ता उदगीर येथील सर्वे क १९/१ प्लॉट क १६ ग्रा प क. १४८० क्षेत्र १४८० ची फ्रुट ज्याची चतु सिमा

पुर्वेस : वाडकरबाई यांची प्लॉटींग
पश्चिमेस : प्लॉट क १५
दक्षिणेस : प्लॉट क ८
उत्तरेस : २० फुटाचा रस्ता

येणे प्रमाणे चुतः सिमेतील जागा त्यातील सर्व तदंगभुत वस्तुसुध्दा

ही जाहीर नोटीस दिली तारीख : ०३-०९-२०२४

अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. एन.एल. मध्वरे,
उदगीर मो.नं. ९४२२२४३५०७

## जाहीरनोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की खाली वर्णन केलेली ही श्री. मिर्झा सिकंदर अलि मिर्झा लियाकतअली पटेल रा. उदगीर ता. उदगीर जिल्हा लातूर यांच्या मालकिची आहे. त्यांनी आमचे अशिल बैंक इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि शाखा उदगीर यांचेकडून सदर मिळकतीवर रक्कम रुपये ५,०१,०००/- (पाच लाख एक हजार रुपये) कर्ज घेतलेले आहे. सदर मिळकत त्यांनी आमच्या आशिल बँक इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा उदगीर यांच्याकडून घेतलेल्या कर्जासाठी दिनांक २६.०८.२०२४ रोजी दुयम निबंधक उदगीर यांच्याकडे फायलिंग नंबर १८४/२०२४ अन्वये नोटीस ऑफ इंटिमेशन रितसर नोंदवुन दिलेले आहे. त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची आमच्या आशिल बँकेस खात्री व हमी दिलेली आहे. अन्यजणांस कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत केली नाही अशी खात्री व विश्वास दिलेला आहे. साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहान, दान, लिज, लायसेन्स अशा कोणत्याही दस्ताने व कराराने सदर मिळकतीत अन्य कोणाचेही हक्क हितसंबंध निर्माण झालेले नाहीत याची खात्री दिलेली आहे जर तसे असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा

मिळकतीचे वर्णन

मौजे सोमनाथपुर ता उदगीर येथील सर्वे क्र. २१३/५ प्लॉट क्र.४ न. प.मि.क ४-२-११४५ क्षेत्र १२५.४६ स्के मि. १३०० चौ. फुट ज्याची चतु सिमा-

पुर्वेस : वलीमोदीन जफ्फरसाथ समयद
पश्चिमेस : नारायण तुकाराम
दक्षिणेस : २० फुटाचा रस्ता
उत्तरेस : बलीक उध्दव कांबळे

येणेप्रमाणे चतुःसिमेतील जागा त्यातील सर्व तदंगभुत वस्तुसुध्दा.

ही जाहीर नोटीस दिली तारीख ०३-०९-२०२४

अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. एन.एल. मध्वरे,

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३३७/२०२४ नि.क्र. १०

ज्याअर्थी नामे Arun S/o. Balaji Nagargoje, R/o Patoda (Kh) Tq.Jalkot Dist.Latur हे दिनांक १२.०४.२०२४ रोजी Kurundwad- Shirol, Dist.Kolhapur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1 Ashvini W/o Arun Nagargoje, Age 33 yrs, Occu. H.H.,
2. Atharv S/o Arun Nagargoje, Age 11 yrs, Occu Education,
3 Avnish S/o Arun Nagargoje, Age-03 yrs, Occu. Nil,
4 Kaushabai W/o Balaji Nagargoje, Age- 78 yrs, Occu. H.H. All R/o Patoda (Kh) Tq. Jalkot Dist. Latur

Minor Applicant No.3 and 4 are U/g. Natural Mother i.e. Applicant No.2 ,

यांनी खालील नमुद ४ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1 Ashvini W/o Arun Nagargoje | 33 | Wife |
| 2. Atharv S/o Arun Nagargoje | 11 | Son |
| 3 Avnish S/o Arun Nagargoje | 03 | Son |
| 4 Kaushabai W/o Balaji Nagargoje | 78 | Mother |

अर्जदार याने Arun S/o. Balaji Nagargoje, या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Arun S/o. Balaji Nagargoje, याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३१/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २३/०९/२०२४

संतोष डी. शिंदे, कनिष्ठ लिपीक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुतराळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५५६/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Babu Haribhau Waghamare हे दिनांक २२.११.२०२२ रोजी Gutti Tq. Jalkot Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Gangabai Babu Waghmare, Age 61 yrs, Occu. Homemaker,
2) Vijaykumar Baburao Waghmare, Age 39 yrs, Occu. Auto Driver,
3) Balaji Babu Waghmare, Age 35 yrs, Occu. Driver, Applicant No. 1to 3 R/at- Gutti, Tal. Jalkot, Dist. Latur.
4) Usha Vaijanath Suryawanshi, Age 40 yrs, Occu. Homemaker,

यांनी खालील नमुद ४ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Gangabai Babu Waghmare | 61 | Wife |
| 2) Vijaykumar Baburao Waghmare | 39 | Son |
| 3) Balaji Babu Waghmare | 35 | Son |
| 4) Usha Vaijanath Suryawanshi | 40 | Daughter |

अर्जदार याने Babu Haribhau Waghamare या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Babu Haribhau Waghamare याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०७/१०/२०२४

ए.बी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर


उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो







उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुगणालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# अलोट गर्दी, उत्स्फूर्त प्रतिसाद आणि असीम प्रेम!

## आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांची जन सन्मान पदयात्रा ।

प्रशांत तांबोळकर

शिरूरआनंतपाळ : माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांची शिरूरआनंतपाळ तालुक्यात जन सन्मान पदयात्रेला नागरिकातुन चांगला प्रतिसाद मिळत असुन गावोगावी प्रत्येक नागरिकाशी आ. संभाजीराव पाटील निलंगेकर संवाद साधत आहेत.

निलंगा विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे आ. निलंगेकरांचा महिला व नागरिकातर्फे सत्कार केला जात आहे.

शिरूरआनंतपाळ भाजपा तालुका अध्यक्ष मगेंश पाटील यांच्या लोकसंर्पकामूळे अनेक तरुण भाजपात प्रवेश करत आहेत. यावेळी शहरातील तात्या पोळकर, व्यंकटजी देवशेटवार, श्रीनिवासजी कुलकर्णी, नुरजी मुजेवार, बाबुरावजी म्हेत्रे, लक्ष्मणजी मुकुटमोरे, गोविंद उजळमकर यांचा त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच शासकीय योजनेतील लाभार्थी



ठरलेले नागरीक माता-भगिनींना लाभार्थी प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पंचायत समितीचे माजी सभापती धोंडीरामजी सांगवे, भाजपा शिरूर अनंतपाळ शहराध्यक्ष संतोषजी शेटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरणजी गोरे व प्रास्ताविक गणेशजी धुमाळे यांनी केले.

यावेळी जनतेशी संवाद साधताना, शिरूर अनंतपाळ येथून रेल्वे जाईल आहे असा शब्द मी येथील जनतेला माननीय रावसाहेबजी दानवे यांच्या विश्वासाखातर दिला होता. यासंदर्भात रावसाहेब दादांनी मागील पाच वर्षात पाठपुरावा करून या प्रकल्पाला मंजुरी दिली असून यासाठी आवश्यक असलेला निधीही उपलब्ध करून दिला आहे. तसेच याबाबत पिंक बुक मध्ये नोंद देखील झाली आहे व यासाठी आवश्यक असणारे बँक अकाऊंट उघडण्यात आले आहे. आगामी काळात हा रेल्वे मार्ग पूर्ण करण्यासाठी रावसाहेब दादांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, त्यासाठी आवश्यक असणारा जनरेटा शिरूर अनंतपाळकरांच्या माध्यमातून आम्ही तुमच्या मागे उभा करू. आपण या संदर्भात भूमिका बजावली तर निश्चितच हा रेल्वे मार्ग लवकर पूर्णत्वास येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री मा.श्री. रावसाहेबजी दानवे, आ. सुरेशजी धस, माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर, तालुकाध्यक्ष मंगेशजी पाटील, निलंगा तालुकाध्यक्ष कुमुदजी लोभे, दगडुजी साळुंके, संजयजी दोरवे, शेषेरावजी ममाळे, व्यंकटजी धुमाळ, गुंडेरावजी जाधव, चिंचनसुरे जी, नरसिंग मामा, लालासाहेबजी देशमुख, शाहुराजजी थेटे, वीरभद्र स्वामी जी, बाळासाहेबजी शिंगाडे, गोविंदजी खुरे, किरणजी उरजे, भारतबाई सोळुंके, नगराध्यक्षा मायावती धुमाळे, उपनगराध्यक्षा सुषमाताई मठपती, सभापती उमाकांतजी देवंगरे, संदिपजी बिराजदार, बाबुरावजी वालंडे, परमेश्वरजी सागावे, श्रीरंगजी बिरादार, धोंडीरामजी सांगवे, यासीनजी मूजेवार, अण्णारावजी नाटकरे, गणेशजी सलगरे, रतनजी जीवने, विवेकजी देवशेटवार, विरभद्रजी मुसाळे, पंडितजी बिराजदार, मुक्तारजी देशमुख, माधवजी अब्दुलपुरे, गणेशजी भुजबळ, ऋषीजी आवळे, माधवजी खरटमुल, सत्यमजी दिगोळे, सचिनजी सांगवे, अविराजजी दांगटे, दत्ताजी शिंदे आदींसह पंचक्रोशीतील सर्व नागरिक, माता-भगिनी, लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दयानंद विज्ञान महाविद्यालयात

## वैज्ञानिक फ्रँक बरनेट यांची जयंती साजरी

लातूर : आजच्या काळात संशोधनाचा विकास होणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःहून या कार्यात भाग घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास आणि कौशल्ये वाढवण्यावर लक्ष केंद्रित करावे. तसेच विद्यार्थी हे प्रथम वर्षात असून देखील स्वतःहून प्रेरित होऊन विविध कार्यक्रमांत सहभागी होतात आणि त्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्र्वास हा वाढतो, असे प्रतिपादन प्रभारी प्राचार्य डॉ.श्याम इबाते यांनी केले.

दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी फ्रँक बरनेट यांची १२५ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.श्याम इबाते आणि डॉ. कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली. जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा. सुभद्रा परगे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

यावेळी जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी. प्रथम वर्षातील बोरे स्वप्नाली या विद्यार्थिनीने सांगितले की, सर फ्रँक मॅकफार्लेन बर्नेट ३ सप्टेंबर १८९९ रोजी यांचा जन्म झाला आणि सामान्यतः मॅकफार्लेन किंवा मॅक बर्नेट म्हणून ओळखले जाणारे, ऑस्ट्रेलियन व्हायरोलॉजिस्ट होते. जे इम्यूनोलॉजीमधील योगदानासाठी ओळखले जातात. प्रतिकारक क्षमता आपल्याला सूक्ष्मजीवांच्या हल्लयांपासून संरक्षण करते आणि घातक ऊतक नाकारते. आपल्या प्रतिकारशक्तीचा काही भाग आनुवंशिक आधार असतो, परंतु त्याचा काही भाग प्राप्त केला जातो. १९४९ मध्ये मॅकफार्लेन बर्नेट यांनी असा सिद्धांत मांडला की, एखाद्याच्या स्वतःच्या आणि परदेशी ऊतकांमधील फरक करण्याची क्षमता आनुवंशिक नसते परंतु गर्भाच्या अवस्थेत ती प्राप्त होते. जेव्हा पीटर मेडावार वेगवेगळ्या उंदरांच्या गर्भांमध्ये ऊतींचे प्रत्यारोपण करण्यात यशस्वी झाले तेव्हा या सिद्धांताला पुष्टी मिळाली. अवयव प्रत्यारोपणासाठी निकालांना महत्त्व होते. १९६० मध्ये त्यांना रोगप्रतिकारक सहिष्णुतेचा अंदाज लावण्यासाठी नोबेल पारितोषिक मिळाले आणि त्यांनी क्लोनल सिलेक्शनचा सिद्धांत विकसित केला. ३१ ऑगस्ट १९८५ रोजी या महान शास्त्रज्ञाची प्राणज्योत मावळली.

याप्रसंगी जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा. श्र्वेता मदने, डॉ. फिरदोस बिरादार, प्रा. स्वरूप गावकरे व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### टिसी इतर कागदपत्रे हरवले आहेत

नेताजी सुभाषचंद्र बोस ज्युनिअर कॉलेज किनगाव ता . अहमदपूर , जि . लातूर या विद्यालयाची गोंडणार सुनील राम या नावाची इयत्ता बारावी सायन्स पास ची टी सी तसेच दहावी सनद ,बारावी सनद व गुणपत्रक किनगाव ते लातूर बस प्रवासादरम्यान हरवले आहे . कोणाला सापडल्यास .मो. ९१९९७५२९५७३३

# आजच्या तरुण पिढीची विवाह एक भीषण परिस्थिती

पुढील काळात लग्न न झालेल्या वयस्कर तरुण-तरुणी मोठ्या संख्येने दिसतील. वृध्द झाल्यावर आधाराला कुणी नसेल आणि पुढील पिढीची वंशवृद्धीचं न झाल्याने वृद्धाश्रमा मध्ये जाण्याची किंवा एकाकी आयुष्य काढण्याची वेळ येणार, यात शंका वाटत नाही. अपेक्षांचे ओझे बाळगून भविष्याच्या बाबतीत विचार न करणारी हि पिढी स्वतः बरोबर पालकांना सुद्धा आयुष्याच्या वृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक चिंताना जन्म देत आहे.कारण मुला-मुलींचे लग्न झाल्यावर पालकांची गृहस्थाश्रमाची जबाबदारी संपते. पुढील पिढीकडे सूत्रे देऊन पालक आपल्या निवृत्ती आयुष्याचे नियोजन करु शकतात. आता मागील एक पिढी आणि आताची विवाह न झालेली पिढी यांचे निवृत्तीचे आयुष्य खडतर असण्याची शक्यता जास्त आहे. ✻फक्त पैसा, प्रॉपर्टी, दागदागिने, गाड्या म्हणजे सर्व सुख नाही.✻ कौटुंबिक आयुष्यात चांगली-वाईट आव्हाने आणि संकटे यांना सामोरे जाताना पतीपत्नी एकमेकांचा मानसिक आधार असतात. जीवनात पूर्णत्वाचा खऱ्या अर्थाने आनंद मिळवायचा असेल तर वाट्याला आलेलं दुःख किंवा प्रतिकुलता सुद्धा सुसह्य होते. ती एकमेकांच्या पूरक भूमिकेमुळे.

शिक्षणाची पात्रता, आर्थिक कमाई, जमीनजुमला, राहण्यासाठी स्वतःचे घर, सौंदर्याच्या व्यापक कल्पना, ठराविक भौगोलिक क्षेत्रात म्हणजे मुख्यतः पुणे, मुंबई, नाशिक येथेच वास्तव्य असावे. याचा दुराग्रह, हट्टापायी विवाहाचे वय निघून जात आहे.

तारुण्याची किंवा ठराविक वयात वैवाहिक सौख्याची प्राकृतिक अनुकूलता आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे. तेही आपणचं आपल्यावर लादून घेतलेल्या अटीमुळे.

खरं तर बायोडाटा बघुन किंवा अभ्यासून त्यातील प्रतिकूल मुद्द्यांवर कशी मात करुन विवाहासाठी पार्श्र्वभूमी तयार करता येईल,याचा विवाहेच्छुक तरुण-तरुणींनी विचार गंभीरपणे करायला हवा. ठराविक बाबींचा अत्याग्रह हा आपल्या वैवाहिक आयुष्याला मारक आणि बाधक ठरत आहे आणि कल्पनांचे इमले रचूनही वास्तवात एकाकीपणे जगायची वेळ येत आहे. आयुष्याची संध्याकाळ जवळ आल्यावर हा विचार करण्यात आपण एवढी मोठी चूक केली त्याचे परिणाम वैयक्तिक आयुष्यावर तर पडणारचं आहेत. पण सामाजिक संतुलन सुध्दा बिघडणार आहे. आपल्या संस्कृतीला सुद्धा याबाबी मारक ठरत आहेत.

# ✻सत्य परेशान होता है लेकीन पराजित नहीं ✻ यांची अनुभूती म्हणजे- जागरण

आदर्श शिक्षक, शिक्षण क्षेत्रातील एक नामांकित व्यक्तिमत्त्व .आजपर्यंत मी फक्त त्यांचं नावच ऐकून होते .असे भारत सातपुते यांच जागरण हे आत्मकथन हाती घेतलं आणि आधाशासारखं अगदी दीड दिवसात पूर्ण वाचून काढलं.या जागरणाच्या पानापानावर मला भारत सातपुते नावाचा शिस्तबद्ध, परखड, साहित्याची कास धरणारे, विद्यार्थी प्रिय व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होत गेलं . पुस्तक पूर्ण झाल्यानंतर भारत सातपुतेची आणि आपली ओळख नाही, त्यांना आपण प्रत्यक्ष पाहिलेल नाही हे मी विसरूनच गेले. मला वाटतं ज्या वेळेस वाचक एखाद्या लेखकाची साहित्यकृती वाचत असताना त्या कृतीशी एकरूप होतो आणि त्या पुस्तकातून वाचकाचे आणि लेखकाचे एक आत्मियतेचं नातं निर्माण होऊन लेखक आपल्या ओळखीचे आहेत ही भावना दृढ होते तेव्हा ती जादू त्या लेखकाच्या शब्दांची असते. तेच लेखकाचचे खरं यश असतं. जागरण वाचत असताना वाचक या साहित्य कृतीशी एकरूप होतो हेच त्या साहित्य कृतीचे खरे यश आहे. सुराज्यासाठी निर्भीडपणे जागरण करणाऱ्या देशभक्तांना... ही अर्पण पत्रिका वाचताना देशभक्त हा शब्द कशाच्या संदर्भात आला असेल हे मला समजले नाही पण संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर माझं संवेदनशील मन पुस्तकातल्या देशभक्तांना शोधू लागलं आणि मी विचार प्रवण झाले, अरे फक्त रणांगणावर जाऊन युद्ध करून देशाचे रक्षण करणारे सैनिक देशभक्त नाहीत, तर या देशातील प्रत्येक नागरिक देशभक्तच आहे .आपण ज्या क्षेत्रात आहोत त्या क्षेत्रात सत्याचा मार्ग धरून निर्भयपणे काम करणारा देशभक्तच असतो की, अशी सत्याची कास धरणाऱ्याला वारंवार आपल्या पातळीवर लढावच लागतं ,कारण प्रत्येक वेळेस त्याला हाणून पाडण्याचा प्रयत्न केला जातो. त्याच्या रस्त्यावर अनेक काटे ठेवून खाचखळगे निर्माण केले जातात पण तो मात्र निर्भयपणे वाट शोधून ध्येयापर्यंत पोहोचतो. याची प्रचिती जागरण वाचताना आली. माणुसकीसाठी जगण्याचा प्रयत्न करीत असताना किती कसरत करावी लागते कारण समाजात स्वतःला माणूस म्हणून घेणारे पशु खऱ्या माणसाला जगू देत नाहीत, हे भारत सातपुते यांचा जीवन प्रवास वाचताना जाणवलं. त्यांच्या बालपणीचा काळ तसा अभावग्रस्त पण गुण्या- गोविंदाने राहणार हे कुटुंब. सणावाराला जे काही गोडधोड मिळाले ते प्रत्येकाच्या समान वाटून घेणारं, दिवाळी सारख्या सणाला फक्त टिकल्यांची डब्बी मिळायची, त्या छोट्या छोट्या टिकल्या दगडाने फोडताना होणारा आनंदही अलौकिकच हो... मजुरी करून माझी मुलं शिकली पाहिजेत ही आई-वडिलांची तीव्र इच्छा. जवळ दमडी नाही पण मनाने आणि संस्काराने श्रीमंत असणारे लेखकाचे आई वडील मला जगातील करोडपती पेक्षाही श्रीमंत वाटतात. वडिलांसोबत जागरण, गोंधळाला जाणाऱ्या लेखकाला बरेच चांगले वाईट अनुभव आले आणि खूप काही शिकायला मिळाले. जसे बकऱ्याचे मुंडके धडा वेगळे करतानाचे ते भयानक दृश्य बघून जीवनात त्यांनी कधीच मांसाहार केला नाही. अगदी बालपणात १९७२ चा भयानक दुष्काळ लेखकाने अनुभवला. शाळेत मिळणारी सुकडी आनंदाने खाल्ली. हे सगळे चित्र वाचताना १९७२ चा दुष्काळ किती जीवघेणा होता याची प्रचिती वाचकाला होते. एक प्रसंग असा आहे तो वाचताना वाचकाचे डोळे पाणावतात- लेखकाच्या बहिणीला दागिन्याची खूप आवड. ही स्त्री सुलभ भावना पण ज्या ठिकाणी दोन वेळचे पोटभर अन्न मिळण्याची भ्रांत तिथे दागिने कुठून मिळणार? मग ही चिमुरडी बाभळीच्या शेंगा दोऱ्यात ओवून आणि त्याचे पैंजण तयार करून त्याचा आवाज आला की आनंदित व्हायची, कापसाची राखी हळदीकुंकवात बुडवून बांधून त्याचाही आनंद घ्यायची. खरंच आनंद पैश्यावर अवलंबून नसतोच आपलं मन महत्त्वाचं आणिआपली मानसिकता महत्त्वाची यावरच आपला आनंद अवलंबून असतो.गरीब कुटुंबात आई, भऊ, आजी भावंड यांच्या प्रेम, स्नेह, जिव्हाळा, विश्र्वास, आपापसातील दृढ नाते-संबंध यांची मात्र श्रीमंती होती.

लेखकाचा शालेय प्रवास सुरू झाला तेव्हा त्यांना लाभलेले गुरुवर्य अत्यंत तळमळीने शिकविणारे. कळत -नकळत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर त्यांचाही प्रभाव आहेच. त्यांच्यामुळे मी घडलो असे म्हणून लेखक आपल्या गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त करतात. बालसुलभ मनाला अनेक नवनवीन गोष्टीचे आकर्षण असतेच. लेखकालाही एकदा आपल्या पायात नवीन चप्पल असावी असा मोह झाला, मग त्यांनी गावात आलेल्या एका पाहुण्याची चप्पल घालून धूम ठोकली.पण... पण घरी आल्यानंतर आईने त्यांना चप्पल आणली तिथून पुन्हा नेऊन ठेवण्यास कसे भाग पाडले, हे पाहण्यासाठी पुस्तकच वाचावे लागते. तसेच आईने आपल्या लेकराला पाण्याच्या प्रवाहात पोहायला कसे प्रवृत्त केले. हा प्रसंग वाचताना मला श्यामची आई आठवली. जागरण वाचताना समाजातील अनेक वृत्ती- प्रवृत्तीची माणसे भेटतात .मुळात लेखकाचा स्वभाव थट्टा मस्करीचा याचाही अनुभव पुस्तक वाचताना वेळोवेळी येतो. रेडीओतील माणसांना झोपू दे की. असं म्हणणारे लेखक आणि त्यांचं ऐकणारा तो डॉक्टरचा मुलगा त्याने तो रेडिओ दगडाने ठेचून काढला. पण आत माणसे भेटलीच नाहीत, मग मात्र दोघांची गालं लाल झाले असो... याचबरोबर पहिल्यांदा फोटो काढण्याचा प्रसंग, पहिल्यांदा फुल पॅन्ट, फुल शर्ट मिळाल्याचा आनंद, पहिल्यांदा बूट मिळाल्याचं अप्रूप. पैसे मिळण्यासाठी दूध विकण्याचा केलेल्या प्रयत्न अशा अनेक प्रसंग वाचताना वाचक पुढे काय ?पुढे काय? म्हणून उत्सुकतेने वाचतच राहतो.लेखकाने पहिल्यांदा कुंदन हा सिनेमा पाहिला आणि मग त्यांची झालेली फजिती वाचकाला यामध्ये वाचायला मिळते. दहावी झाल्यानंतर डी.एड साठी लेखकाला खूप अडचणी आल्या. पहिल्या वर्षी एक विषय गेला पण त्यांनी डी.एड पूर्ण केलं. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची लिपिक पदासाठीची परीक्षा दिली आणि नोकरीवर रुजू झाले. मुंबई मिळाले नोकरी मिळाली पण हाल संपले नाही तेव्हा ती नोकरी सोडावी लागली. मग शिक्षक पदाची मुलाखत दिली आणि... आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी शिक्षक म्हणून ते रुजू झाले. त्यांचा शिक्षक म्हणून जीवन प्रवास सुरू झाला. त्या दिवसापासून त्यांनी स्वतःला विद्यार्थी, शाळेसाठी समर्पित केले. आदर्शासाठी, सत्यासाठी लढताना त्यांना खूप संघर्ष करावा लागला. त्यांचा संघर्ष वाचताना मन हेलावते. चांगल्या व्यक्ती सोबतच असं का? प्रश्न भेडसावतो पण म्हणतात ना सत्य स्वतःला सिद्ध करेपर्यंत असत्य गावभर फिरून येतं. आणि असत्यच लोकांना सत्य वाटायला लागतं. लेखकाचा शिक्षण क्षेत्रात शिक्षक म्हणून प्रवेश झाला आणि शिक्षण क्षेत्रातील विदारक सत्य समोर येऊ लागले. त्या विदारक परिस्थितीशी दोन हात करताना लेखकासारख्या सत्याची कास धरणा-या व्यक्तीला किती त्रास होतो याची प्रचिती जागरणच्या पानोपानी येते. बालगोपाळात रममाण होणारा हा हाडाचा शिक्षक शिक्षण क्षेत्रातील घाणेरडे राजकारण पाहून व्यथित होतो. वेळोवेळी जसं जमेल तसं त्याचा विरोध करतो, पण या सत्याच्या मार्गावर चालणा-या त्या शिक्षकाच्या पावला- पावलावर काटे पेरणारे थकत नाहीत ,मग हा ही सगळ्यांना पुरून उरतो. यासाठी कित्येक वेळा त्यांच्या जीवावरही बेततं. खरच सातपुते सरांचा हा संघर्ष वाचताना मला बारावीच्या पाठ्य पुस्तकातील पाप के चार हाथियार कन्ह्यालाल मिश्र प्रभाकर यांच्या निबंधाची आठवण झाली. चांगलं काम करणाऱ्यांना पदोपदी विरोध करायचा हीच आमच्या समाजाची मानसिकता. उपेक्षा, निंदा, हत्या,श्रध्दा हे चार हत्यार वापरून काम करणाऱ्याचा बिमोड केला जातो. सातपुते सर या सर्व पायऱ्यावरून जातात पण कोणाला न घाबरता सत्य काय आहे हे सर्वांसमोर ठेवतात मग यात विद्यार्थी पट, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, परीक्षा पद्धती, शिक्षकांची गुणवत्ता, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मानसिकता, शासकीय अधिकारी यांची उदासीनता आणि सगळ्यात घाणेरडे राजकारण म्हणजे एखाद्या महिला कर्मचाऱ्याला हाताशी धरून चांगलं काम करणाऱ्याच्या चरित्रावर शिंतोडे उडवून त्याला जीवनातून उठवण्याचा प्रयत्न करणे. हत्या फक्त शरीराचीच होत नसते, हत्या मनाची ही होत असते. एखाद्याला त्याच्या कामापासून दूर ठेवायचे असेल, सातपुते सारखा माणूस कितीही संकट आली तरी तो आपल्या तत्वापासून दूर जात नसेल तर तर मग त्याचे चरित्र हनन करून त्याचे खच्चीकरण केले जाते. त्यावेळी त्याच्या मनावर किती मोठा आघात होतो याचा कोणीही विचार करत नाही. जागरण मध्ये हे सगळं वाचताना अंगावर काटा उभा राहतो. या सर्व कटकारस्थानाला लेखक खूप हिंमतीने सामोरे जातात. सातपुते सरांनी प्राथमिक शिक्षकापासून ते मुख्याध्यापक, केंद्र संचालक पदापर्यंत अनेक जबाबदाऱ्या पार पडल्या. ते करत असताना शिक्षकांचे शिकवणे, त्यांचे ज्ञान तपासणे, त्यांना शिस्ती याबाबत वेळोवेळी सूचना देणे, या सूचना द्याव्यास लागतात पण कामचुकार, आळशी, व्यसनी लोकांना नेमकं हेच नको असतं. मग हे नको अशा वृत्तीची लोक एकत्र येतात आणि कोणत्याही स्तराला जाऊन किळसवाणे राजकारण करतात. या राजकारणाचे सातपुते सर शिकार झाले. त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला. त्याचा त्यांना शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रास सहन करावा लागला पण ते मुळीच डगमगले नाहीत. खोट्याला खोटं आणि खऱ्याला खरं म्हणण्याची सुद्धा हिम्मत असावी लागते. बरं असेही नाही की ते समोरच्याच्या फक्त चुकाच काढतात, जे शिक्षक चांगले काम करतात त्यांच्या पाठीवर ते कौतुकाची थाप देण्यास सदैव तत्परच असतात. एकीकडे आपल्या अल्पशा मूलभूत गरजा भागवताना अनेक अडथळे त्यांना पार करावे लागले. कौटुंबिक प्रश्र्नही होतेच, त्यात नोकरीत मुद्दाम निर्माण केलेले काही प्रश्र्न, विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी लढावा लागणारा लढा. या तीनही पातळीवर सातपुते सर धैर्याने लढले. हे सगळं करताना स्वतःमधील खेळकर वृत्ती त्यांनी मरू दिली नाही .कोणत्याही गोष्टीला सकारात्मक भावनेने घेण्याचा त्यांचा स्वभाव. कॉपीमुक्त अभियान राबवताना पंचक्रोशीत त्यांचा दबदबा निर्माण झाला होता. केंद्र संचालक म्हणून त्यांची ज्या सेंटरवर नियुक्ती झाली असेल ,त्या केंद्राला विद्यार्थी म्हणत यह केंद्र मौत का कुआ है , यहां भारत सातपुते केंद्र संचालक है ।एवढी धास्ती विद्यार्थ्यांनी घेतली होती. या केंद्रावर राजकारणी, अधिकारी पैसेवाले ,धनवान कोणाचीही मुलं असू देत सातपुते सर घाबरत नव्हते. विद्यार्थी, पालक, शिक्षक ,अधिकारी यांच्यावर सातपुते सरांचा एक आदरयुक्त दरारा होता कारण त्यांना लबाडी, खोटारडेपणा, लाचारी,भ्रष्टाचार पटत नव्हता. जिथे काही चुकीचे दिसले त्या ठिकाणी सातपुते सर विरोध करणारच .त्यांची हीच वृत्ती अनेकांना खटकत होती, म्हणूनच त्यांचे विरोधक अधिक होते. त्यांनी सत्यासाठी दिलेला लढा, विद्यार्थी, शाळा, गाव यांच्यासाठी केलेलं काम हे सगळं सगळं अनुभवासाठी जागरण वाचावच लागतं. केवळ या हाडाच्या शिक्षकानी सत्याची कास धरली म्हणून त्याला पोलीस स्टेशनची वाट धरावी लागली. त्यांचे निलंबन व्हावे म्हणून साम-दाम, दंड, भेद सगळ्याचा वापर केला गेला. याचा सरांना खूप त्रास झाला पण शाळेसाठी, शाळेतील लेकरासाठी ते निवृत्तीच्या दिवसापर्यंत लढत राहिले. जिद्द, चिकाटी ,खरेपणा, परखडपणा याला समाजातून विरोध होत असला तरी समाजात त्याला साथ देणारे असतातच .समाजात ९९ टक्के वाईट असतील पण एक टक्का चांगलेही असतात, या एक टक्क्यावरच हे जग चालू आहे कारण इतकं सगळं होऊनही. विरोधकांनी आपापल्या परीने सरांची बदनामी करूनही, सत्य लपले नाही. सातपुते सरांचं काम बोलकं होतं ना .त्यांच्या कामाची अनेक संस्थांनी दखल घेतली, त्यांना मोठमोठे पुरस्कार मिळाले. शासन, सेवाभावी संस्था यांच्याकडून त्यांचा सन्मान झाला . कष्टाला गोड फळ मिळालंच . त्यांच्यावरचा गुन्हाही न्यायालयाने रद्द केला. कोविडच्या कालखंडात सातपुते सर सेवानिवृत्त झाले. गावासाठी ,शाळेसाठी त्यांनी खूप खूप केलं पण सेवानिवृत्त होताना ते म्हणतात मला अजून खूप काही करायचं होतं ते राहून गेलं. अविरत काम करणाऱ्यांची कामसू वृत्ती ही चिरंतरच असते . सेवानिवृत्तीनंतरही भ्रष्टाचार, काळाबाजार, खोटारडेपणापणा, लाचलुचपत याविरुद्ध त्यांचा लढा चालूच आहे. जागरण लिहून त्यांनी खरंच पडद्यामागे जे राजकारण चालते त्यांचा पडदा फाश करून शिक्षण, समाज, सरकारी कार्यालय यांच्या खऱ्या खऱ्या रूपाचे दर्शन वाचकांना घडवले. त्यांच्या या परखड विचारा सोबत त्यांची परखड लेखणी समाजातील वाईट वृत्तीवर बोट ठेवते.तना-मनाने विद्यार्थ्यांसाठी धडपडणारा हा शिक्षक आजही शाळाबाह्य मुलांसाठी अविरत कार्यरत आहे. जागरण वाचताना कधी डोळे पाणावतात, कधी हसायला, तर कधी वाचक निःशब्द होतो, तर कधी खूप राग येतो. कधी काही पात्रांची खूप दया येते आणि शेवटच्या वाक्यात वाक्यातून तर वाचकांना प्रेरणा मिळते लेखक म्हणतात- प्रयत्न थांबू नये आपण आपले कर्तव्य करत राहावे. डोंगरदऱ्यातून सूर्य वर येतोच ना! माळावर काट्याकुट्यातून उगवूनही फुलांनी कधी फुलायचं जागरण सोडले काय? श्र्वास आहे तोपर्यंत सुवास देतातच ना! खरंय सर आपल्यासारखे सूर्य समाजाला प्रकाश देण्यासाठी सतत धडपडतात , आपल्यासारखे फुलं आपल्या विचारांचा सुवास देण्यासाठीच आहेत. याची प्रचिती जागरण वाचताना आली. खूप वाईट वाटलं चांगल्या वृत्तीवरच नेहमी आघात का होतो? पण सर सत्य परेशान होता है परंतु पराजित नही होता। हे ही तितकंच खरच आहे. लेखक भारत सातपुते यांच्या कार्याला, त्यांच्या लेखणीला, त्यांच्यातील सर नाही गुरुजीला त्रिवार वंदन. प्रस्तुत जागरण या पुस्तकाचे मुखपृष्ठ प्रसिद्ध चित्रकार सरदार जाधव यांनी सुंदर आणि समर्पकपणे रेखाटले आहे. प्रत्येक शिक्षकांनी जागरण वाचून त्यातून बोध घ्यावा. देशभक्तीसाठी जागरण असून सातपुते गुरुजींचे तत्व अंगिकारावे आणिआपल्या शिक्षकी पेशाला सार्थ बनवावे ही अपेक्षा.!!

✻✻✻✻

-स्वाती कान्हेगावकर
नांदेड.


यशवंत
बुधवार दिनांक ०४ सप्टेंबर २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com


# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज उदगीरमध्ये

## मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री क्रीडा मंत्र्यांच्या उपस्थितीत महिलांचा आनंद मेळावा





**उदगीर (प्रतिनिधी)** मराठवाड्यातील ऐतिहासिक नगरी असणाऱ्या उदगीरला भारताच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या, ४ सप्टेंबरला सकाळी सव्वा अकरा वाजता येणार आहेत. त्यांच्यासोबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही आगमन होणार आहे. त्यांच्या आगमनासाठी शहर सजले असून महिलांचा आनंद मेळावा व विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण उद्याचे प्रमुख आकर्षण आहे.

मराठवाड्याच्या प्रथम दौऱ्यावर येत असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या सकाळी नांदेड येथे विशेष विमानाने येत असून त्या ठिकाणावरून हेलिकॉप्टरने उदगीरला येत आहे.

राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासन गेल्या अनेक दिवसांपासून या आयोजनासाठी झटत असून उद्या राष्ट्रपतींचे उदगीर येथे आगमन होणार आहे. त्यानंतर त्या उदगीर शहराच्या भागात असणाऱ्या विश्वशांती बुद्ध विहाराच्या लोकार्पणाला उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपती या ठिकाणी असतील त्यानंतर उदयगिरी कॉलेज मैदानावर आयोजित महिला आनंद मेळाव्याला त्या सहभागी होतील. या कार्यक्रमांमध्ये राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे सहभागी होणार आहेत.

राज्य शासनाने या ठिकाणी शासन आपल्या दारी आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व अन्य लाभाच्या योजनांच्या कार्यक्रमांचा आनंद मेळावा आयोजित केला आहे. हजारो महिला या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपती या ठिकाणी मार्गदर्शन करणार आहेत. उद्या राष्ट्रपती महिलांना काय मार्गदर्शन करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून जिल्हाभरातील महिलांना उद्याच्या कार्यक्रमाची उत्सुकता आहे.

राष्ट्रपती कार्यक्रमानंतर पुन्हा नांदेडकडे प्रयाण करतील. नांदेड वरून त्या दिल्लीला रवाना होणार आहेत. राष्ट्रपती गेल्या दोन तारखेपासून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत उद्या त्यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा अखेरचा दिवस असून जाताना त्या नांदेड येथे तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारात दर्शन घेणार आहे.

# ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलचे कराटे स्पर्धेमध्ये यश




**उदगीर (प्रतिनिधी)** युनिव्हर्सल कराटे अकॅडमी व जीके इंटरनॅशनल कराटे अकॅडमी यांच्या वतीने आयोजित दुसऱ्या निमंत्रित राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलचा संघ सर्व दुतीय क्रमांक पटकावून कराटे स्पर्धेत सलग विजयाची परंपरा ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राखली या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यात ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलच्या २९ विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गटांमध्ये सहभाग नोंदवत चमकदार कामगिरी करत प्रतिस्पर्यकाला हरवत यशाला गवसणी घालून वेगवेगळ्या पथकाची कमाई करत सांघिक सर्व द्वितीय क्रमांकाच्या ट्रॉफ्फीवर आपले नाव कोरले त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय रमेश बिरादार त्याचबरोबर मॅनेजिंग डायरेक्टर सुरेश बिरादार सुजित बिरादार प्राचार्य आम्रपाली सर्वदे प्रशासकीय अधिकारी रामेश्वर सगरे आदींनी सर्व विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या त्यांना कराटे प्रशिक्षक प्रसाद माळी सर क्रीडा शिक्षक विठ्ठल कुरणे विशाल कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षक इतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते



उदगीर येथील दैनिक यशवंत विभागीय कार्यालयास लातूर विभागाचे माहिती उपसंचालक (अ.का.) प्रविण टाके सहाय्यक संचालक (माहिती), डॉ. श्याम टरके व उपसंपादक रेखा पालवे (गायकवाड) यांनी सदिच्छा भेट दिली या प्रसंगी 'तुझा विसर न व्हावा' ग्रंथभेट देवून स्वागत करताना राम मोतीपवळे.
यावेळी रोहित मोतीपवळे, सुर्यकांत मादळे, मल्लिकार्जुन कुंभार इत्यादी




**महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. स्मिता नागोरी लखोटिया या नियत वयोमानानुसार ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्ताने इंग्रजी विभागातील आजी -माजी विद्यार्थ्यांनी त्यांचा सेवापुर्ती सोहळा आयोजित केला होता, त्याप्रसंगी सत्कारमूर्ती प्रा. डॉ स्मिता नागोरी- लखोटिया, डॉ. रामाप्रसाद लखोटिया व विद्यार्थी.**


## घर विकणे आहे

शिवाजी महाविद्यालय / विद्यावर्धिनी हायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम रामचंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८०x८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेले ३१ रुम विकणे आहे.

संपर्क : ९८२३६३२३००,
९४२३३४७७५०,
९०९६४२४०४२


# जय हिंद पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये मुलीसाठी गुड टच-बॅड टच विषयावर विशेष सेमिनार सपन्न




**उदगीर (प्रतिनिधी)** येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जय हिंद पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच इनरव्हील क्लब उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुधीर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी पहिली ते पाचवी वर्गात शिकणाऱ्या मुलींसाठी मगुड टच-बॅड टचम या विषयावर विशेष सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या सेमिनार मध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून इनरव्हील क्लब उदगीरच्या प्रीती दुर्गकर तर कार्यक्रमांचे अध्यक्ष म्हणून संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी व स्कूलच्या व्यवस्थापिका ज्योती स्वामी उपस्थित होत्या.

या सेमिनार मध्ये मार्गदर्शन करताना प्रीती दुर्गकर म्हणाल्या की, आज मुला- मुलींना वयात येत असताना काही गोष्टी सांगणे काळाची गरज बनली आहे. प्रत्येक पालक, शिक्षक यांनी आपल्या स्तरावर गुड टच-बॅड टच विषयी माहिती देणे गरजेचे आहे. कोणता व्यक्ती कोणत्या हेतूने स्पर्श करीत आहे. हे मुलींना समजले पाहिजे. कारण दिवसेंदिवस मुलींवरील अत्याचारात वाढ होत आहे. हे थांबविण्यासाठी असे सेमिनार आयोजित करणे काळाची गरज आहे असे ही त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात ज्योती स्वामी म्हणाल्या की, मुलींना कोणता स्पर्श गुड आणि कोणता बॅड हे माहीत पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीने केलेला स्पर्श तुम्हाला आवडला तर त्याला गुड टच व नाही आवडला तर बॅड टच असे समजावे. यासाठी सर्वप्रथम मुलींना त्यांच्या अवयवा विषयी माहिती देणे गरजेचे आहे. त्याच बरोबर त्यांच्या प्रायव्हेट पार्टस ला वाईट हेतूने स्पर्श केला तर त्याचा प्रतिकार कसा करावा व याबाबत तात्काळ कशी सुटका करावी हे त्यांनी विविध उदाहरण देत माहिती दिली. तसेच लहान मुलींना प्रेमाने कोणी अनोळखी व्यक्तीने काही खायला दिले तर त्यांनी ते स्वीकारू नये व जवळ जाऊ नये व पालकांनी देखिल याबाबत जागरूक राहण्यासाठी आपल्या मुलांना वेळ द्यावा असे ही त्या म्हणाल्या.

सदरील सेमिनारचे सूत्रसंचालन व आभार नॅबेटच्या समन्वयक मनोरमा शास्त्री यांनी मंडले. हे सेमिनार यशस्वी करण्यासाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा मानसी चन्नावार, सचिव पल्लवी मुक्कावर, माजी अध्यक्ष स्वाती गुरुडे,डॉ.प्रियंका राठोड, सोनाली आचमारे, तेजस्विनी मंगुळकर, सुजाता कोनाळे,जय हिंद पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य सतिश वाघमारे, स्नेहा लांडगे व जय हिंद पब्लिक स्कूलच्या सर्व शिक्षिका यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठया संख्येनी मुली उपस्थित होत्या.

# लॉयन्स क्लब उदगीरचा उद्या पदग्रहण सोहळा

## निमित्य धमाल कार्यक्रमाचे आयोजन








लॉ. अ‍ॅड. व्यंकट मारे | लॉ. अ‍ॅड. बालाजी वलांडीकर | लॉ. शशीकांत पेन्सलवार | लॉ. विजय देबडवार | लॉ. डॉ. भाग्यश्री घाळे | लॉ. किशन राजपाल

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील लॉयन्स क्लब उदगीर आणी लॉयन्स क्लब उदगीर उमंग या दोन्ही क्लबच्या नुतन पदाधीकारी यांचा पदग्रहण सोहळा दिनांक ५ संप्टेबर २०२४ रोजी सायंकाळी ०५ वाजता रघूकुल मंगल कार्यालय उदगीर येथे संपन्न होत आहे.




लॉयन्स क्लब उदगीरच्या नुतन अध्यक्ष पदी लॉ. अ‍ॅड. व्यकंट मोरे सचिव लॉ. अ‍ॅड बालाजी वलांडीकर आर्णे कोषाध्यक्ष पदी लॉ. शशिकांत पेन्सलवार यांची निवड झाली आहे तर लॉयन्स क्लब उदगीर उमंग चे नविन पदधिकारी, लॉ. विजय देबडवार, सचिव लॉ. डॉ. भाग्यश्री घाळे तर कोषाध्यक्ष पदि लॉ. किशन राजपाल हे काम पाहणार आहेत. या समारंभासाठी पदग्रहण अधिकारी म्हणुण लॉयन्स चे व्हाईस डिस्ट्रीक गव्हर्नर चगत्र लॉ. राहूलब औसेकर हे उपस्थित राहणार आहे.

पदग्रहण सोहळया निमीत्य लॉयन्स क्लबने खास उदगीर करांसाठी मनोरंजनाने भरपूर असा महाराष्ट्राचे सुप्रसिध्द हास्य अभिनेते अजीत कुमार कोष्टी यांचा एक पात्री प्रयोग ङ्गहास्यरंगङ्ग चे पण विशेष आयोजन केले आहे.

उदगीरच्या रसिक प्रेक्षकांनी या दोन्ही कार्यक्रमास उपस्थीत रहावे असे आवाहन माजी अध्यक्ष लॉ. ईश्वरप्रसा बाहेती सचिव लॉ. सुरेश देबडवार तसेच कॅबिनेट ऑफीसर PMJF लॉ. डॉ. राम प्रसाद लखोटिया आणी मुखब संयोजक व कॅबिनेट ऑफ्फीसर चगत्र लॉ. प्रा. महेश बसपूरे यांनी केले आहे.